
# जागतिकीकरण आणि देशीवाद

रंगनाथ पठारे



MR
891.46
P 273 J

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

जागतिकीकरण आणि देशीवाद

Entered

# जागतिकीकरण आणि देशीवाद

Ani Deshiwad

१५ एप्रिल २००२ रोजी श्रमिक प्रतिष्ठान,
कोल्हापूर येथे दिलेले व्याख्यान


रंगनाथ पठारे

Ranganath Pathare



लोकवाङ्मय गृह

**जागतिकीकरण आणि देशीवाद** / रंगनाथ पठारे

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 273 J
00124292

म/९३६
© रंगनाथ पठारे
पहिली आवृत्ती (I) : जुलै २००३
दुसरी आवृत्ती (I) : ऑक्टोबर २००३
तिसरी आवृत्ती (I) : जानेवारी २००५
चौथी आवृत्ती (I) : ऑगस्ट २००६ Aug 2006

MR
891.46
P 273 J

मूल्य : १० रुपये Rs. 10/-
ISBN 81-88284-23-8

124292
31.3.08

मुद्रक/प्रकाशक :
प्रकाश विश्वासराव Prakash
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५
Mumbai

मुद्रणस्थळ :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

या व्याख्यानाच्या निमित्तानं संयोजकांनी मला कोल्हापूरला येण्याची संधी दिली त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. इथं येणं मला नेहमीच आवडतं. कोल्हापूर हे महाराष्ट्रातल्या हाताच्या बोटांवर मोजता येईल अशा काही शहरांपैकी एक आहे, की ज्यानं अजूनही आपला चेहरा शाबूत ठेवलेला आहे. याचा संबंध जागतिकीकरणाशी — मी ज्यासंबंधी बोलणार आहे — त्याच्याशी आहे. जागतिकीकरणाच्या या अभूतपूर्व वावटळीत स्वत:चा चेहरा एखाद्या शहरानं, माणसानं वा समूहानं राखणं ही मोठी मुश्कील गोष्ट झालेली आहे. सगळ्या सजीव व निर्जीव तरीही उपयोगी भासणाऱ्या व्यवस्थांचं 'कमोडिटी'मध्ये रूपांतर होणं; त्यांचा चेहरा वा वेगळेपण संपून त्यांची निर्विकार एकके (युनिट्स) तयार होणं ही जागतिकीकरणाची एक अपरिहार्य निष्पत्ती आहे. अशा युनिफॉर्म कमोडिटींच्या रचनेवर आपल्याला हव्या त्या गोष्टी लादणे; त्यांना व्यापारी हेतूंसाठी हवे तसे सोयिस्कर वापरणे भांडवलशहांना सगळ्यात सोयिस्कर असते. म्हणून चेहरा नाहीसा करणे ही त्यांची गरज असते.

कोल्हापुरात आलं की अजूनही एक प्रकारची खानदानी अदब, एक प्रकारचं दणकट निरोगीपण आणि माणसांच्या स्वभावातलं सरळ थेटपण यांचा संस्कार होतो. वरवरचा अर्थ घेऊन कोणी याचा संबंध सरंजामी व्यवस्थेविषयी आपल्या मनात असलेल्या सुप्त आकर्षणाशी जोडेल. माझ्या मनात ते उरलेलं आहे असं मला वाटत नाही. राजर्षी शाहू छत्रपती यांना पारंपरिक अर्थानं सरंजामदार म्हणणं अशक्य आहे. त्यांनी घालून दिलेली सांस्कृतिक, सामाजिक रीत इथं अजूनही शिल्लक आहे. ती आदर वाटावा अशीच आहे.

अगदी पहिल्यांदा मी कोल्हापुरात आलो तेव्हा साहजिकच मला इथल्या रस्त्यांची फारशी माहिती नव्हती. उतरलो अन् सरळ एका रिक्षात बसलो. त्याला म्हटलं, अमुक अमुक ठिकाणी जायचंय. तो म्हणाला, 'उतरा खाली!' मी चकित झालो. रिक्षावाला प्रकृतीने दणकट होता आणि त्याचा आवाजही त्याच जातीचा. मी चाचरत विचारलं, 'का बरं?' म्हणाला, 'उतरा, खाली उतरा.' मी उतरलो. म्हणाला, 'इथं जवळच आहे ते. चला, मी सोडतो.' असं म्हणून तो पायी मला

त्या जवळच्या ठिकाणी सोडायला आला. याच्या अगदी उलट प्रकारचे कैक अनुभव पुण्या-मुंबईत माझ्या गाठीशी आहेत. कोल्हापूरचा पहिला अनुभव असा होता अन् उत्तरोत्तर या शहराविषयी माझं प्रेम वाढतच गेलं. राजन गवस यांच्यासारखे माझे सख्खे मित्र या भागातले आहेत. आणखीही मित्र आहेतच. अशा मित्रांमुळंही शहरं आपल्या मनात असतात. अर्थात मैत्रभावाचा भाग हा नंतरचा. असो.

जागतिकीकरणाचा सध्याचा सुस्थापित अर्थ थोडा वेळ बाजूला ठेवून समजा आपण असं म्हटलं की जागतिकीकरण म्हणजे जगातल्या वेगवेगळ्या मानवी संस्कृतींनी एकमेकींशी संवाद करणं; त्यांनी एकमेकींना भेटणं; त्यांच्यात काही व्यवहार, व्यापार होणं; तर अशा जागतिकीकरणाला प्रदीर्घ परंपरा आहे. हिंदुस्थानातल्या माणसांनी अग्नेय आशियातल्या, ईशान्येकडच्या देशात जाणं—लाओस, कंबोडिया, थायलंड किंवा खाली मलेशिया, इंडोनेशिया—किंवा तिथल्या लोकांनी इकडे येणं हे प्राचीन काळापासून आहे. सांस्कृतिकदृष्ट्या असं जोडलं जाणं पूर्वापार आहे. नुसत्या एका रामायणाचा किंवा महाभारताचा विचार केला तरी या भूभागात त्यांची—त्या महाकाव्यांची—कितीतरी वेगवेगळी रूपं व कथानकं आपल्याला दिसतात. अरबी व्यापाऱ्यांनी, भटक्या टोळ्यांनी कितीतरी प्रकारचं ज्ञान हिंदुस्थानातून युरोपात व जगाच्या अन्य भागांत नेलं. डाक्क्याची मलमल रोमन सम्राटांच्या, तिथल्या अभिजनांच्या वापरात होती हेही सर्वांना माहीत आहे. हिंदुस्थानसारख्या सुपीक प्रदेशाचा लोभ दीर्घकाळापासून अनेकांना वाटत आलेला आहे. अनेक दिशांनी अनेक प्रकारचे मानवी वंश इथं आले व रहिवासले आहेत. मुघल लोकांनी अनेक कला इथं आणून रुजवल्या; उत्तुंग शिल्प उभारली. वेगवेगळ्या मूल्यव्यवस्थांच्या टकराव-संघर्षातून सतत नवं घडत राहिलं.

अशा प्रकारचं आदान-प्रदान विस्तृत भूप्रदेशात जगभर होऊन मानवी संस्कृती समृद्ध होत गेल्या आहेत. या आदान-प्रदानात मी युद्धांचादेखील समावेश करीन. वेगवेगळे रीतिरिवाज, भाषा, संकल्पना असलेले समाज युद्धांच्या निमित्ताने समारोसमोर आल्यावर त्यातूनही पुष्कळ घडलेले दिसते. युद्धांच्या निमित्ताने देशभर आपले मराठी लोक गेले. त्यातून आपली भाषाही समृद्ध झाली. आजही कितीतरी अरबी, फारसी किंवा तुर्की मूळ असलेले शब्द आपल्या भाषेत आहेत. ते सारे मराठीच होऊन गेलेले आहेत. किंवा उर्दूसारखी भाषा ही अशा टकरावातून, रहिवासातून इथे जन्माला आली. मराठीचा जोमदार प्रभाव असलेली दख्खनी उर्दूही आपल्याला माहीत आहे.

पण हे सारे संथ गतीने होत होते. जरुरीपुरते उत्पादन, जरुरीपुरता खर्च,

अगदीच जास्त गरज भासली तर युद्धे करून काही बळकावणे व स्वत:ला जागा करून घेणे असे या साऱ्याचे स्वरूप होते. अगदी पानिपतचे तिसरे युद्धही फार मोठे म्हणता यायचे नाही. मुख्य म्हणजे व्यापारी हितसंबंधांच्या सोयीसाठी युद्ध लढण्याची संकल्पना तोवर नव्हती.

युरोपात अठराव्या-एकोणिसाव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. त्याआधी नैसर्गिक विज्ञानासंबंधीचे कुतूहल त्या प्रदेशात वाढीला लागले. विज्ञानात भराभर नवे शोध लागू लागले. साधारणत: एकोणिसाव्या शतकाला युरोपातला अभिजात भौतिकीचा (Classical Physics) कालखंड म्हणता येईल. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस वैज्ञानिक विश्वामध्ये साधारणत: मन:स्थिती अशी झाली होती की, नवीन शोधायचं आता फारसं काही उरलेलं नाही. माहीत करून घ्यायचं ते सारं जवळपास माहीत झालेलं आहे. नवं काही दिसण्याची, सापडण्याची शक्यता उरलेली नाही. या भौतिकीत साधारणत: मेकॅनिक्स, पदार्थांचे गुणधर्म, औष्णिक ऊर्जाशास्त्र, थर्मोडायनॅमिक्स, विद्युत चुंबकीयशास्त्र इत्यादींचा समावेश होता. हे बव्हंशी स्थूल स्वरूपाचं विज्ञान होतं. या काळात विज्ञानाचा तंत्रज्ञानात (Technology) रूपांतर होण्याचा वेग अत्यंत कमी होता. युरोपात पहिली औद्योगिक क्रांती झाल्यानंतर पुष्कळ वर्षे विज्ञान हे याच टप्प्यावर होतं.

औद्योगिक क्रांतीमुळं व्यापार, मानवीसंबंध, समाजजीवन, संस्कृती, धर्म यांच्या स्वरूपांत आणि संकल्पनांत क्रांतिकारी बदल झाले. या गोष्टी अर्थातच प्रामुख्याने युरोपात झाल्या. यंत्रांच्या साहाय्याने वस्तूंचे उत्पादन अमाप प्रमाणात होऊ लागले. मोठ्या प्रमाणावर कामगारांची आवश्यकता निर्माण झाली. ती पूर्ण करण्यासाठी मोठ्या संख्येने स्थानिक लोकांना कामावर घेतले गेले. त्यातून राजाचे जे निसर्गदत्त अधिकार वा ईश्वरदत्त अधिकार म्हणा, ते संपले. एक नवा, मोठा व वेगळा संघटित वर्ग तयार झाला. यंत्रांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर माल तयार होऊ लागला तशी त्याला हुकमी गिऱ्हाईकांची, बाजारपेठांची आवश्यकता भासू लागली. या काळात युरोपातल्या बऱ्याच देशांच्या जगभर वसाहती होत्या. त्या वसाहतीतील पारंपरिक उद्योग मोडून काढून तिथं कृत्रिमरीत्या गरजा निर्माण करून आपला माल खपवणं या देशांना शक्य झालं. वसाहतीच्या देशात उपलब्ध होणारं स्वस्त मनुष्यबळ—खरं म्हणजे कवडीमोलानं मिळणारं मनुष्यबळ—इकडून तिकडे सहज हलवता आलं. भारत, मॉरिशस, वेस्ट इंडिज बेटे किंवा ऑस्ट्रेलियाजवळ फिजी येथे अशाच गरजांपोटी पुष्कळ लोक नेण्यात आले. किंवा आफ्रिकेतून बोटींनी भरभरून काळी माणसे वेठबिगारी करण्यासाठी सध्याच्या अमेरिकेत

नेण्यात आली. भारतात आपल्याकडं मांजरपाट नावाचा एक जाडाभरडा कपडा अगदी परवापर्यंत—सुमारे चाळीस वर्षांपूर्वीपर्यंत—अगदी भरपूर मिळत असे. मांजरपाट हे मँचेस्टर क्लॉथचं देशी नामकरण. इथल्या हातमागावरचा उद्योग मोडकळीस आणून हे स्वस्त कापड इथं दीर्घकाळ वापरलं गेलं. डाक्क्याची महागडी मलमल आधीही जनसामान्य वापरत नव्हते. नंतर ती नाहीशीच झाली.

हे सारं बव्हंशी ग्रेटब्रिटन आणि त्याच्या वसाहतींमधलं चित्र म्हणता येईल. पण युरोपात औद्योगिक क्रांती फक्त ब्रिटनमध्येच झाली असं नव्हे तर ती फ्रान्स, हॉलंड, जर्मनी अशी सगळीकडेच झाली. सगळीकडे ती एकाच वेळी झाली असंही नाही. इंग्रजांच्या जशा वसाहती होत्या तशाच फ्रेंच व डच लोकांच्याही होत्या. जर्मनांच्या फार कमी. स्पेन आणि पोर्तुगालच्याही होत्या पण हे दोन्ही देश सगळ्यात आधी वसाहती करून नंतर स्वत: धार्मिक भानगडीत वेगळ्या रस्त्यानं गुंतत गेले. व्यापाराच्या दृष्टीने इंग्रजांच्या वसाहती मोठ्या होत्या. फ्रेंचांच्या, डचांच्या लहान होत्या; तरीही होत्या. जर्मनीत औद्योगिक क्रांती काहीशी उशिरा झाली पण त्यांचं तंत्रज्ञान तुलनेनं अधिक प्रगत होतं. साहजिकच उत्पादनाचा वेग जास्त होता अन् हुकमी बाजारपेठा त्यांच्याकडं फारशा नव्हत्या. त्या मिळवायच्या तर जर्मनांना इंग्रज, फ्रेंच यांचा पराभव करणं आवश्यक होतं. गेल्या शतकातल्या दोन्ही महायुद्धांना ही व्यापारी गरजांची महत्त्वाची पार्श्वभूमी आहे. या महायुद्धांमुळे अपरिमित मानवी संहार, भीषण हानी होऊन युरोपातील जिंकणारे व हरणारे असे सारेच दुबळे होऊन गेले. या महायुद्धाची सगळ्यात कमी झळ पोहोचलेली अमेरिकेची संयुक्त संस्थाने—ज्यांचा उल्लेख सर्वसाधारणपणे आपण अमेरिका असा करतो ती—आणि ज्यांना सगळ्यात जास्त झळ बसली तो रशिया—ज्यात बाकी सोवियत प्रजासत्ताके होती—अशा दोन महासत्ता युद्धानंतर उदयाला आल्या.

आधीच्या युरोपी वसाहतवादी सत्तांपेक्षा या दोन्ही खूप वेगळ्या प्रकारच्या सत्ता होत्या. त्यांच्या दार्शनिक प्रणाली परस्परविरोधी होत्या. एक मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारी तर दुसरी समाजसत्तावादाचा घोष करणारी. पण प्रचंड मोठा भूप्रदेश हे त्यांच्यातलं साम्य होतं. पारंपरिक पद्धतीनं एखादं सैन्य या देशांच्या भूभागात घुसल्यास मागे सरकण्यासाठी त्यांच्याकडं भरपूर जागा होती. रशियानं आधी नेपोलियनच्या सैन्याशी व नंतर हिटलरच्या जर्मन सैन्याशी त्याचा वापर करूनच तोंड दिलं हे आपल्याला माहीत आहे. आधी भरपूर आत येऊ द्यायचं आणि नंतर येणाऱ्या सैन्याला गारठवून मारायचं—तोवर तग धरायची अन् निसर्गाला आपलं काम करू द्यायचं हे तंत्र या दोन्ही युद्धात रशियानं केवळ

मोठ्या भूप्रदेशाच्या बळावर वापरलं. त्यात अर्थात रशियाचं नुकसानही खूप झालं. रशियन लोकांना खूप त्याग करावा लागला. लाखो रशियन मृत्युमुखी पडले.

सलग मोठा भूप्रदेश, नैसर्गिक ऊर्जास्त्रोतांची विपुलता आणि दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस वाट्याला आलेले बुद्धिमान जर्मन शास्त्रज्ञ हा रशिया व अमेरिका यांच्यातला समान दुवा होता. हे शास्त्रज्ञ त्यांनी अक्षरश: वाटून घेतले होते. असं म्हणतात की रशियानं युरी गागारिनला अंतराळयानात जेव्हा पाठवलं तेव्हा— म्हणजे माणसानं यानात बसून अंतराळात जाण्याचा तो पृथ्वीवरचा पहिलाच प्रसंग होता आणि ती फार अद्‌भुत गोष्ट होती; तर त्या वेळी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या सल्लागारांना विचारलं की, हे झालं कसं? अंतराळ विज्ञानाच्या क्षेत्रात रशियन आपल्या इतके पुढे कसे गेले? आपण इतके मागे कसे राहिलो? तेव्हा हा सल्लागार राष्ट्राध्यक्षांना म्हणाला, त्यांच्याकडं असणारे जर्मन शास्त्रज्ञ आपल्याकडच्या जर्मन शास्त्रज्ञांपेक्षा अधिक बुद्धिमान आहेत. त्यामुळं हे घडलंय.

आता हा गमतीनं मांडला जाणारा संवाद प्रत्यक्षात घडला नसेलही. पण मुद्दा असा की, या प्रकारचं बुद्धिमान मनुष्यबळही या महासत्तांना दुसऱ्या महायुद्धाअखेरीस भरपूर मिळालं. १९९१ नंतर सोवियत सत्ता कोलमडल्यावर रशियन शास्त्रज्ञांचीही अशीच वाताहत झाली आहे. त्यातले कैक दिशा फुटेल तिकडे गेलेले आहेत. त्याचे परिणामही येणाऱ्या काळात घडणार आहेत. पण हा नंतरचा मुद्दा.

पृथ्वीवर अशा दोन महासत्ता उभ्या झाल्यावर त्याचे दूरगामी परिणाम झाले. दुनियेच्या सर्व भूभागांवर, तिथल्या साधनसंपत्तीवर आपलं नियंत्रण राहावं यासाठी या महासत्तांचे प्रयत्न सुरू झाले. पूर्व युरोप रशियाच्या आधिपत्याखाली तर पश्चिम युरोप अमेरिकेच्या कच्छपी असं चित्र उभं राहिलं.

सलग मोठाले भूप्रदेश असलेले देश टिकू न देणं; भूराजनैतिकदृष्ट्या महत्त्वाच्या भूभागांवर नियंत्रण ठेवणं; लष्करीदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणं ताब्यात ठेवणं; शहाला प्रतिशह देणं; ऊर्जेची विपुलता असलेल्या भूभागांवर ताबा मिळवणं; शेजारी देशांना एकमेकांशी झुंजत ठेवणं अशा चाली दोन्ही महासत्ता खेळत राहिल्या. अरब देशांच्या समूहात याच भूमिकेतून वा दृष्टीतून ब्रिटन-अमेरिकेनं इस्त्राएल देश उभा केला. इराण, इराक, सौदी अरेबिया, कुवेत, व्हेनेझुएला, नायजेरिया, सुदान अशा कितीतरी ठिकाणी ऊर्जास्त्रोतांवर ताबा ठेवण्यासाठी हालचाली, शह-प्रतिशह असं शीतयुद्धाचं वातारवण कायम राहिलं. इकडे कोरिया, व्हिएतनाम, किंवा ऑस्ट्रेलियाजवळचा इंडोनेशियाचा भाग अशी सारीकडं कधी ना कधी

कायम युद्धं. लॅटिन अमेरिकेत युद्ध व यादवी, अमेरिकन बनाना कंपन्यांचा अमर्याद विस्तार, चिलीच्या साल्वादोर आयंदेचा धडधडीत खून अशा घटना सतत होत राहिल्या. विस्ताराची अमानवी भूक फक्त भांडवलशहांच्या ठायी होती असं नाही. सोविएत महासत्ताही या खेळात शहाला प्रतिशह देण्यात कुठंही ढिलाई दाखवत नव्हती. साठीच्या दशकात क्युबाच्या निमित्ताने आण्विक युद्धाच्या उंबरठ्यावर जग आलं होतं.

या सगळ्याला पहिल्या औद्योगिक क्रांतीची आणि दोन महायुद्धं होऊन गेल्यानंतरची पार्श्वभूमी होती. या काळात विज्ञानात शोध लागणं व त्याचं तंत्रज्ञानात रूपांतर होणं याच्यामधला वेळ भरपूर होता. कधी कधी त्यासाठी ३०-४० वर्षेसुद्धा जात. निर्माण होणाऱ्या वस्तूंमध्ये टिकाऊपणा हे महत्त्वाचं मूल्य होतं. जुनी फावरलुबा कंपनीची घड्याळं ३०-४० वर्षे विनातक्रार चालत. वस्तू दणकट व मोठाल्या असत. कंपन्या सामान्यत: राष्ट्रीय मर्यादा असलेल्या होत्या. त्यांच्या मालाचा विस्तार त्या त्या देशांच्या अंकित वसाहतीत फार तर होता. वसाहती नाहीशा होऊ लागल्या. तिसऱ्या जगाचा उदय झाला. तरीही परिस्थिती एकूण आटोक्यात होती.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मॅक्स प्लँक या तरुण जर्मन शास्त्रज्ञानं 'क्वांटम हायपोथिसिस' मांडलं. त्याआधीच्या विज्ञानात स्थूल स्वरूपातल्या वस्तूंमधल्या क्रिया-प्रतिक्रिया, त्यांचं गतिशास्त्र हे न्यूटन, लॅग्रांजे, केप्लर प्रभृतींच्या नियमांनी समजावून घेता येत असे. पण पदार्थाचा जो अतिसूक्ष्म भाग—म्हणजे अणू; त्यालाही स्ट्रक्चर असतं आणि त्याच्यातही अनेक सूक्ष्म कण असतात; त्यातले बरेच अल्पकाळ टिकणारे असतात आणि अशा सूक्ष्म पुंजांच्या अनेक गुणांच्या देवाणघेवाणीत अणूच्या आत बरंच काही घडत असतं. प्लँकचा सिद्धान्त या सूक्ष्म दुनियेतल्या व्यवहाराच्या गतिशास्त्रासंबंधी होता. या एका सिद्धान्तामुळं विसाव्या शतकाच्या आरंभीच्या काही दशकात नैसर्गिक विज्ञानात क्रांतिकारी बदल झाले. रुदरफोर्ड, आइन्स्टाईन, एस. एन. बोस, रामन्, हायजेनबर्ग, बोह्र, सॉमरफील्ड, थॉमसन्, मॅक्स बॉर्न, एन्रिको फर्मी, हाइटलर, लंडन, फॅरडे अशा कितीतरी शास्त्रज्ञांनी प्लँकचा सिद्धान्त अनेक दिशांनी विकसित करीत नेला. विसाव्या शतकात नैसर्गिक विज्ञानात जे जे काही घडलं त्यावर प्लँकच्या सिद्धान्ताची छाया आहे.

तरीही या वैज्ञानिक कामाचं तंत्रज्ञानात रूपांतर होण्याचा वेग नेहमीच कमी राहिला. दुसऱ्या महायुद्धानंतर विज्ञानातील शोध आणि त्याचं तंत्रज्ञानात रूपांतर

होणं यातील काळाचं अंतर कमी व्हायला सुरुवात झाली आणि साधारणत: सत्तरीच्या दशकात हे काळाचं अंतर जाणवण्याइतपत कमी व्हायला सुरुवात झाली. ती खऱ्या अर्थानं आज दिसणाऱ्या जागतिकीकरणाची दृश्य सुरुवात म्हणता येईल. हे सारं आपल्याकडं पोहोचायला नव्वदीचं दशक उजाडलं आणि आपल्याकडं त्यासंबंधी चर्चा सुरू झाल्या.

सत्तरीच्या दशकात जगभर कमी-जास्त प्रमाणात बदलांना सुरुवात झाली. ती जगण्याच्या सगळ्या क्षेत्रांत झाली. मुख्य म्हणजे जगण्यासंबंधीच्या विविध सुप्रतिष्ठित धारणांवर घाला घालण्याची प्रक्रिया त्यातून सुरू झाली. भौतिक व्यवहार बदलले. मानवी संबंधांचं स्वरूप बदलायला सुरुवात झाली. वस्तूंची, ऊर्जास्त्रोतांची अमाप नासाडी सुरू झाली. उत्पादन अवाढव्य प्रमाणात करायचं आणि त्याला तितकी मागणी कायम राहील अशी परिस्थिती निर्माण करायची ही व्यापारी गरज निर्माण झाली. नफेखोरी हे जगण्यातलं प्रधान मूल्य म्हणून प्रतिष्ठित व्हायला सुरुवात झाली. टिकाऊपणा ही संकल्पना अडगळीला जाऊ लागली. रेडिओत पूर्वी जर्मन बनावटीचे व्हॉल्व्हज् असत. रेडिओचा आकार मोठा आणि दणकट. आवाजाची गुणवत्ता उत्तम. घेतला की पिढीभर प्रश्न नसायचा. अगदीच एखादा व्हॉल्व्ह गेला तर तेवढा बदला. प्रश्न संपला. सत्तरीच्या दशकानंतर त्या प्रकारच्या व्हॉल्व्हज्ची जागा ट्रान्झिस्टर्सनी घेतली. मी म्हणतो त्या सूक्ष्म विज्ञानाचं तंत्रज्ञानात रूपांतर होण्याचं हे एक उदाहरण. सेमी कंडक्टर्स, इंटिग्रेटेड सर्किट्स अशा गोष्टी आल्यानं या उद्योगात क्रांती झाली आणि हे फक्त एक उदाहरण. पृथ्वीच्या कक्षेबाहेर उपग्रह पाठवण्याचं तंत्रज्ञानं विकसित करत असताना त्याला पूरक अशी अनेक तंत्रज्ञानं विकसित करावी लागली आणि त्यातल्या अनेकांचा पृथ्वीवरल्या जीवनावश्यक व चैनीच्या गोष्टींच्या निर्मितीवर प्रभाव पडू लागला. मूलभूत गरजा व चैनीच्या गरजा यांच्यातली रेषा धूसर होत जाणे ही नंतरची पायरीही फार वेगानं पार होऊ लागली.

या दुसऱ्या औद्योगिक क्रांतीचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य म्हणजे निर्मितीचं असाधारण प्रमाण व त्याची आवश्यकता. वस्तूंचं बारक्या प्रमाणावर उत्पादन न करता येण्यासारखी वस्तूंमधूनच निर्माण झालेली, उद्भवलेली वस्तुस्थिती आणि प्रचंड प्रमाणावर उत्पादन केलं की अगदी कचऱ्याच्या भावात म्हणता येईल या दरानं वस्तूंची होऊ शकणारी निर्मिती. यातून एक नवीच अद्भुत परिस्थिती निर्माण झाली. तिचे अनेकांगी परिणाम झाले. सध्याच्या जागतिकीकरणाचा पायाच घातला गेला.

प्रचंड मोठ्या प्रमाणावर उत्पादन करायचं तर त्यासाठी भांडवली गुंतवणूकही मोठीच लागणार. कोणत्याही एका व्यक्तीला सहसा ती करणं जमण्याजोगं नसे. त्यातून भाग भांडवल उभारणे म्हणजे अनेकांनी अशा कंपनीचे शेअर्स विकत घेणे ही बाब आली. त्यातून शेअरबाजार अन् सटोडियांचं जग. मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलं की खपवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गिऱ्हाईक मिळवणं; तयार करणं ही गरज निर्माण झाली. यात गिऱ्हाईक नुसतं मिळवणं अपुरं पडू लागलं. कारण वस्तू एकदा घेतली की त्याची गरज संपणार. इकडं निर्मिती तर अवाढव्य वेगानं चालू. त्यामुळं मोठ्या प्रमाणावर गिऱ्हाईक तयार करणं आणि त्याच्या मनामानसातलं टिकाऊपण हे मूल्य घालवून नावीन्याचा हव्यास हे मूल्य पेरणं. वस्तू काही काळ वापरा अन् फेका. थ्रो अवे! नवीन वस्तू पहिलीपेक्षा वेगळी असेल, सुधारित (!) असल्याची हमी निर्माते देतील. उत्तम वेळ दाखवणारी इलेक्ट्रॉनिक घड्याळं किलोच्या हिशेबानं वजनावर मिळतात. शहरातल्या मध्यमवर्गीयांच्या घरातला कचरा वाहून नेणाऱ्या गरिबांना त्याचे जितके पैसे समजा महिन्याकाठी मिळतात त्यात किलोभर घड्याळं सहज उपलब्ध आणि हे एक उदाहरणच फक्त. निर्मितीच्या सगळ्या क्षेत्रात निर्मितीचा असा महापूर येतो. कोणतीही निर्मिती करताना ऊर्जा लागतेच. ती जितकी वापराल त्यापेक्षा जास्त वाया जाते. कसं ते नंतर सांगतो. तूर्तास ऊर्जेची नासाडी वाढते, एवढाच निर्देश करतो. बाकी पारंपरिक उत्पादनं—लोखंड, कोळसा, त्यांच्यावर आधारित उद्योग अशा साऱ्यांचं बृहद् आकारांच्या कंपन्यांत रूपांतर झालं. तिथंही शेअरबाजार आणि सटोडिया. त्यातही गिऱ्हाईकं निर्माण करणं. उदाहरणार्थ, शस्त्रास्त्रांचे कारखाने चालायचे असतील तर युद्धं झाली पाहिजेत. ती होत नसतील तर घडण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. प्रत्येक शस्त्राला तोड म्हणून आणखी मोठ्या ताकदीची शस्त्रं तयार करायची आणि हे सारं अव्याहतपणे चालू.

आणि हे फक्त अशा वस्तूंबाबत नाही. शेती हा मूलभूत उद्योग. शेतीउत्पादने, खते, दुग्धव्यवसाय अशा साऱ्यांवर या बृहद् कंपन्या वा तत्सम बड्यांचा साऱ्या दुनियेवर ताबा. गरीब देशांनी फक्त गिऱ्हाईक असावं. त्यांच्याकडच्या ऊर्जास्रोतांवर बड्यांचा ताबा. मग अगदी कशातूनही—पाण्यातूनही—अमाप पैसा. बाटलीबंद पाणी प्या. आरोग्याला हितकारक. अमुक कंपनीचं जास्त चांगलं. प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या अमेरिकन कंपनी पुरवील. त्यांची विल्हेवाट गरीब देशांनी स्वत:च्या भूमीत लावावी. कंपन्या तुम्हाला प्रत्येक वेळी ताजी, नवी बाटली देणार. प्लॅस्टिकचं तुम्हाला काय करायचं ते करा. परवाच मी कोणत्यातरी नव्या पाण्याच्या कंपनीची जाहिरात पाहिली. त्यांची एक लिटरची बाटली ७५ रुपयांना

आहे. सर्वोत्तम! अर्थातच त्यांनाही गिऱ्हाईक मिळणार. अशा बाटल्यांमधून पाणी पिणं हा स्टेटस सिम्बॉलचा भाग. त्याला प्रमाण मानणारा उच्च मध्यमवर्ग, उच्च वर्ग जगभर तयार आहे. तशी मानसिकता पेरली गेलीय.

जागतिकीकरणाचा आजचा हा चेहरा अमानवी आहे. यात देवाणघेवाण नाही. ताकदवान धनदांडगे देतील ते बाकीच्यांनी घ्यायचं. त्यांच्या तालावर नाचायचं. जगा म्हणतील तोवर जगायचं. त्यांना तुम्ही उपयोगाचे राहिला नाहीत तर मरायचं. दुनियेच्या प्रगतीसाठी गरिबांनी तेवढा त्याग केला पाहिजे! खाजगीकरण व उदारीकरण या अशा जागतिकीकरणाच्या सोबतच्या अविभिन्न गोष्टी आहेत. गरीब देशांनी आपल्या सामाजिक व्यवस्था धनदांडग्यांसाठी खुल्या करायच्या. त्यांनी आपल्या देशात काय व कसं जगायचं; कायदा व न्यायाची व्यवस्था कशी ठेवायची हेसुद्धा हे दांडगे ठरवणार.

संगणक क्रांती अन् इलेक्ट्रॉनिक माध्यमे, प्रसारमाध्यमे यांनी बड्यांची ताकद अवाढव्यपणे वाढवली आहे. या सगळ्यांवर बव्हंशी मोठ्या सत्तांचा ताबा आहे. आपण काय, कसे, किती बघायचे, वाचायचे वा शोधायचे याचा विचार करण्याची आवश्यकताच संपेल अशी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. संभ्रमावस्था, कुंठितावस्था अशा शब्दांचे अर्थच बदलत चालले आहेत. सामान्य माणसाने काहीही विचार करायचा नाही. ती जबाबदारी पार पाडणारे वेगळे लोक आहेत. ते देतील ते घ्यायचं. त्यांनी निर्माण केलेल्या भ्रामक वास्तवात खेळायचं. हे भ्रामक वास्तव स्वत:च्या जगण्यावर लादून तुकडे तुकडे व्हायचं. त्याला इलाज नाही.

मुळात एका व्यापारी उद्देशानं सुरू झालेली व आता जगड्व्याळ स्वरूप धारण केलेली ही प्रक्रिया सर्वसाक्षी, सर्वभक्षी, सर्वस्व व्यापणारी अशी झालेली आहे. जगण्याच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व्यवहारांना एका सूत्रात ओवणे ही तिची अंतिम आकांक्षा असणार. किंबहुना आहे. कारण ते सगळ्यात सुलभ आणि सोयिस्कर. त्यासाठी युनिफॉर्म घाटाचा, युनिफॉर्म मागणी असणारा वर्ग जगभर तयार करणं आवश्यक. त्यासाठी तशी संस्कृती जगभर विकसित करणं आवश्यक. म्हणूनच सांस्कृतिक अर्थाने दुनियेवर ताबा मिळवणं आवश्यक.

असा ताबा मिळाला की हुकमानुसार वागणाऱ्या गुलामांसारखी गिऱ्हाईकांची जगड्व्याळ व्यवस्था उभारता येते. गरजेनुसार या गिऱ्हाईकांना पाहिजे तसं पाहिजे तिकडं वळवता येतं. अंतत: या गिऱ्हाईकांचं रूपांतर उपयोगाची व उपभोगाची सजीव वस्तू (लाईव्ह कमोडिटी) म्हणून होतं. जशी डुक्कर किंवा बैल ही खाण्यासाठी वाढवण्याची वस्तू तशीच ही गरीब दुनियेतील माणसं. त्यासाठीच त्यांच्या भाषा,

संस्कृती, मूल्यव्यवस्था यांच्यावर घाला घालायचा अन् तिथं धनदांडग्यांना सोयीचं सारं उभं करायचं. व्यापक शोषणासाठीची निर्धोक अतिव्याप्त व्यवस्था.

इथं प्रश्न असा उपस्थित होतो की आपल्यासारख्या 'तिसऱ्या दुनियेतल्या' माणसांनी या प्रक्रियेकडं बघायचं कसं? आणि करायचं काय? अनेक पर्याय उपलब्ध असतात. उदाहरणार्थ, येऊ घातलेली भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था यांचा सरळ अंगीकार करून त्यात सहभागी होणे. म्हणजे असं की, नाहीतरी अमेरिकन संस्कृती ही आता जागतिक संस्कृती होणारच आहे ना, तर तिच्यात सरळ शिरून स्वत:चा विकास करून घेण्यात गैर ते काय? अखेरीस व्यक्तीच्या विकासासाठीच व्यवस्था असतात ना! मग तिथं ही काय अन् ती काय, कसला फरक पडतो? अर्थात यात व्यक्तीचा विकास म्हणजे काय वा तो कोणत्या पद्धतीनं होतो हा प्रश्न लगेच उपस्थित होतो पण तो तूर्तास आपण बाजूला ठेवूया आणि हा एक पर्याय खुला असतो एवढं म्हणूया. दुसरा पर्याय म्हणजे नाकारणं. व्यक्तीच्या व समूहाच्या पातळीवर येणाऱ्या साऱ्या गोष्टी नाकारत आपल्या उपलब्ध कोषात घट्ट राहण्याचा प्रयत्न करणं. तिसरा, काहीच ताप न करून घेणं. म्हणजे काय येतंय ते येऊ देत, काय व्हायचं असेल ते होऊ देत. आपलं सगळं ठीक आहे ना! किंवा नसेल तर आपल्यापुरता मार्ग काढायचा की संपलं. बाकी झगझग करायची नाही. चौथा, येईल त्या गोष्टींना सामोरं जाणं. त्यासाठी आपल्याजवळची आपली भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था यांची ताकद वापरून उभं राहणं. येणाऱ्या गोष्टींना पचवण्याचा, आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आपलं स्वत्व टिकवणं. ते अधिक बलशाली करण्याचा प्रयत्न करणं.

इथं देशीवाद नामक विचारप्रणालीचा संबंध येतो. तो वर उल्लेख केलेल्या चौथ्या पर्यायाच्या स्वरूपात येतो. देशीवादासंबंधी व्याख्या, विवेचन असं काही बोलण्याआधी प्रश्नच उपस्थित करूया की प्रत्यक्ष व्यवहारात हे सगळं कसं होतं आणि त्याची निष्पत्ती काय असते?

पहिला पर्याय हा सगळ्यात आकर्षक असतो. परक्या मूल्यव्यवस्थांचं आत्मसातीकरण त्यात नसतं. तिथं आपणच त्या व्यवस्थेचा भाग होणं, त्यासाठी आवश्यक ती चपळता दाखवणं व त्याद्वारे आपला फायदा करून घेणं असतं. इंग्रजांचं राज्य भारतात आल्यावर शिक्षणाची परंपरा असलेल्या आपल्या लोकातील बारक्या वर्गानं इंग्रजी भाषेचा अंगीकार करून कारकुनीच्या जागा पटकावल्या. बाकी देशी लोकांवर अंग्रेजसाहेबाची गुलामी राबवण्याच्या यंत्रणेत कारकुनी दर्जाची जागा मिळवून स्वत:ला सुरक्षित केलं. आज जागतिकीकरणाच्या भव्य

लाटेत या प्रकारे सहभागी होऊन बाकी कशाचाही विचार न करता सहभागी होणारा वर्ग आहेच. या वर्गाने भारतात आणि दुनियाभर संधी मिळेल तिथे या प्रकारे आपली जागा पटकावलेली आहे. आपण संधी साधून योग्य तेच केलं आहे अशा तात्पुरता भ्रमावस्थेत हे लोक असतात. तिथं आपली जागा कोणती आहे; आपलं स्थान काय आहे याचं भान त्यातल्या काहींना कदाचित नंतर येईलच आणि स्वत:च्या विकासासंबंधी त्यांच्या मनात प्रश्नही उपस्थित होतील. तूर्तास आक्रमक शक्तिशाली व्यवस्थेत बौद्धिक गुलामगिरीच्या जागा पटकावून ते देशी स्वजनांसह इतर गरीब देशांतील लोकांना गिळण्याच्या प्रक्रियेत सहभागी झालेले आहेत इतकंच म्हणूया. हे लोक परकी मूल्यव्यवस्था, भाषा, संस्कृती यांचं आत्मसातीकरण करत नसतात. ते त्यांचा सरळ अंगीकार करतात, हे ध्यानात घेतलं पाहिजे.

येणारी व्यवस्था नाकारणारे लोक आपल्या शुचित्वाचा अनाठायी आविष्कार करणारे होत. शुचित्व नावाची गोष्ट टिकवत कोणतीही संस्कृती टिकत नसते. येणारं नाकारत आपल्या कोषात घट्ट रुतणारे बहुश: संपतात. यांच्यामध्ये एक प्रचंड अहंगंड असतो आणि तोच त्यांना बळ देत असतो. त्यामुळे हा पर्याय टिकाव धरत नाही.

तिसरा पर्याय हा कोत्या रस्त्याचा, सोपा व दुनियेसंबंधी उदासीनतेकडं नेणारा असतो. या उदासीनतेत फक्त प्रतिक्रियाशून्यता मात्र नसते. आपलं आपण बघायचं, बाकी ताप कशाला करा, ही वृत्ती त्यात प्रभावी असते.

परकी संस्कृती येताना हे तीनही पर्याय बव्हंशी एकाच वर्गातल्या कमीअधिक श्रेणीच्या स्तरांमधून स्वीकारले जातात. यातल्याच काहींनी—विशेषत: त्यातल्या ज्या वर्गाचे हितसंबंध तिथल्या देशी व्यवस्थेत धोक्यात आलेले आहेत असे ज्यांना वाटत असते त्यांनी—परकी प्रभावांना निमंत्रण दिलेले असते. म्हणजे असं की, तुम्ही या आणि हे ताब्यात घ्या. आमचे हितसंबंध राखा. बाकी आमचं काही म्हणणं नाही, असं यांचं म्हणणं असतं. राणा संगाने इब्राहीम लोदीला हटवण्यासाठी बाबराला बोलावणं किंवा मराठ्यांच्या विरोधात अहमदशहा अब्दालीला नजीबखानाने बोलवणं किंवा नंतर रघुजी भोसल्यास बंगालमध्येही असंच स्थानिक भांडणात बोलावण्यात आलं अन् इंग्रजांची मदत नंतर पुष्कळ संस्थानिकांनी एकमेकांच्या विरोधात घेत अंततः ते सारे इंग्रजांचे गुलाम झाले. आपला वा परका असे क्षुद्र (!) भेदाभेद या प्रवृत्ती करीत नाहीत. त्यांचे व त्यांच्या वर्गाचे हितसंबंध हे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे.

हितसंबंधांच्या या श्रेणीव्यवस्थेत सगळ्यात तळाशी असलेला एक भला मोठा वर्ग असतो; तो जनसामान्यांचा. तो सगळ्या भानगडींपासून कोसो दूर असलेला. पण येणाऱ्या प्रभावांना पचवण्याची जबाबदारी पार पाडणारा. बहुश: आपण असे काही करतो आहोत याची जाणसुद्धा नसलेला. येणारे प्रभाव पचवण्याखेरीज उभे राहण्यासाठी या वर्गाला कोणतेही पर्याय खुले नसतात. पचवण्यासाठीची आयुधं हे लोक जशी स्वत:च्या मूल्यव्यवस्थेतून उभी करतात तशीच परक्या प्रभावांमधूनही. इस्लामी राज्यकर्त्यांच्या दीर्घ कालखंडात आपली श्रमणसंस्कृतीची परंपरा तेजाळत जाळत आपल्या संतांनी आपली भाषा, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था टिकवली, बळकट केली ती याच पद्धतीनं. त्यांनी एकीकडं भारतीय श्रमणसंस्कृतीच्या मूल्यव्यवस्थेचा पुरस्कार केला; ब्राह्मणी धर्मातील ईश्वर आणि माणूस यांच्यातील मध्यस्थ नाकारला व त्याचवेळी इस्लाममधील उदारमतवादी सुफींना आपल्या गुरुपरंपरेत आदरस्थानी बसवले. आपले सारे संत अशा जनसामान्यांतून आलेले होते हा काही निव्वळ योगायोग नाही. ज्ञानेश्वर, एकनाथ हे जन्माने ब्राह्मण असले तरी ब्राह्मणी व्यवस्थेने त्यांना नाकारलेले होते हे लक्षात घेतले पाहिजे.

ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत सुमारे चारशे वर्षे सतत चाललेल्या या जागरामुळेच सारे प्रभाव पचवत आपली भाषा, संस्कृती टिकली. अरबी, फारशी, तुर्की अशा सगळ्या भाषांचे प्रभाव पचवत, त्यातल्या कैक शब्दांना मराठीच्या पोटात घेत मराठी भाषा आणखी समृद्ध होत गेली. परकी सांस्कृतिक आक्रमणांना पचवून उभे राहण्याचा, आपले स्वत्व टिकवण्याचा हा देशी वारसा आपल्या संतांनी आपल्याला दिलेला आहे.

आजच्या जागतिकीकरणात आपली भाषा, मूल्यव्यवस्था धोक्यात आलेली असताना या देशी वारशाची आठवण जागवणे म्हणूनच महत्त्वाचे आहे. जागतिकीकरण आणि साहित्यातील देशीवाद यांचा संबंध या पद्धतीने विचारात घेणे गरजेचे आहे.

आता प्रश्न समजा असा की हे करायचं कशासाठी? एवढा जीवाचा आटापीटा करून आपली भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था टिकवायची कशासाठी? जे कालबाह्य झालेलं आहे; अर्थहीन झालेलं आहे त्याला टिकवायचा व्यर्थ प्रयत्न का करायचा? यातला दुसरा प्रश्न म्हणजे कालबाह्यता, अर्थहीनता या धारणेतलं गृहीतकच मुळी चुकीचं आहे. भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था यांचा संबंध आपल्या सबंध अस्तित्वाशीच असतो. आपलं एक स्वतंत्र, सार्वभौम व्यक्ती म्हणून जगणंच तिच्या आत असतं. ती संपली की आपली सार्वभौमता संपली. आपण उरतो ते

दुसऱ्या कोणत्यातरी आक्रमक जगड्व्याळ दुनियेतील उपयोगाचे सजीव. उपयोगी वस्तू. गुलाम. दुय्यम, तिय्यम दर्जाचे माणूस. आपल्यातलं जे कालबाह्य आहे ते संपेलच. त्याला आपण संपवू. तो अधिकार आपला. इतरांचा नाही. आपण आपल्या इच्छेनं, आपल्या विवेकावर विसंबून त्याचा निर्णय घ्यायचा. इतर कोणी काही म्हणतंय, लादतंय म्हणून नाही ही धारणा देशीवादी धारणा आहे. भाषा, संस्कृती, मूल्यव्यवस्था टिकवायची ती या प्रकारे गुलामी नाकारण्यासाठी. स्वत:ला परपुष्ट करून परिपुष्ट होण्यासाठी. मग प्रश्न असा की इतकी ताकद आपल्या मूल्यव्यवस्थेत आहे का? आजवरचा आपला इतिहास ती आहे असं सांगतो. आणि आक्रमक व्यापाऱ्यांच्या दुनियेला आपण आजच कैक ठिकाणी नमायला भाग पाडल्यांचही दिसतं. आजच्या परिस्थितीत उभे राहण्यासाठी, टिकण्यासाठी देशीवादी असणं हा एकमेव पर्याय जनसामान्यांना खुला आहे. लेखकाची बांधिलकी प्राय: अशाच वर्गाशी असते. म्हणून साहित्यातील देशीवादाचा मुद्दा आज फार महत्त्वाचा झालेला आहे. तो फक्त आपल्या भाषेपुरता, आपल्या देशातील भाषांपुरता महत्त्वाचा नाही. जगातल्या तमाम त्या त्या देशातील भाषांसाठी महत्त्वाचा आहे. रशियन, चिनी, फ्रेंच, जर्मन, स्वाहिली अशा भाषांसाठीही तो महत्त्वाचा आहे.

लेखकाची बांधिलकी नेहमीच जनसामान्यांशी असते का? ती असावी का? ती असावी हे तर नक्की. पण आपल्या दृष्टीने यात एक निष्कारण सक्तीचा मुद्दा उद्‌भवू शकतो. पण आता समजा, असा पवित्रा घेतला की लेखकाच्या लेखनाच्या मुळाशी कोणत्या ना कोणत्या प्रकारे व पातळीवर वेदनाच असते आणि या वेदनेचा संबंध या ना त्या प्रकारे शोषणाशी असतो. हे कोणालाही मान्य होण्यासारखे आहे. हरिभाऊ आपटे यांचा जन्म ब्राह्मण जातीत झाला. त्यांना माहीत असलेली दुनिया बव्हंशी त्याच स्तरातील व प्रामुख्याने पुण्यातील होती. तरीही त्यांनी बालविवाह, विधवांची दु:खे, केशवपन अशा कुप्रथांच्या विरोधात लेखणी चालवली. त्यांची बांधिलकी, त्यांना जाणवलेली वेदना ही पीडितांचीच होती. साने गुरुजी, भाऊ पाध्ये या अधिक व्यापक मराठी समाजाला आस्थेच्या कवेत घेणाऱ्या लेखकांचा विचार करताना हा मुद्दा आणखी स्पष्ट होतो. अगदी किरण नगरकर (<u>सात सक्कं त्रेचाळीस</u>), शांता गोखले (<u>रीटा वेलिणकर</u>) यांचं लेखन महत्त्वाचं आहे ते या दु:खाशी, वेदनेशी नातं असल्यामुळंच. त्यामुळं वेदना सोसणारा, पीडित, शोषित वर्ग या अर्थाने जनसामान्य असं फारतर म्हणावं लागेल आणि यातून परस्परांना छेदणारं असं काही उभं राहत नाही. लेखकाची राजकीय भूमिका, बांधिलकी हे सगळं बाजूला ठेवलं—जे ठेवायचं तसं कारण नाही पण—तरीही फारसा फरक पडत नाही. त्याची माणसाशी, माणुसकीशी, मानवी

मूल्यांशी बांधिलकी कोणत्या प्रकारची आहे, हेच तर तो आपल्या लेखनातून मांडत असतो.

आपल्या भाषेत किंवा एकूण भारतीय उपखंडातील भाषिक संस्कृतींमध्ये देशीवादाची पहिली मांडणी भालचंद्र नेमाडे यांनी केली. ती करताना त्यांनी त्यासाठी चांगला मोठा ग्रंथ लिहून सुस्पष्ट, व्यापक स्वरूपात केलेली नाही अशी एक टीका होत असते. नवे काही यायचे ते आधीच या प्रकारे ग्रंथाच्या स्वरूपात यावे असा आग्रह तितका योग्य नाही हे तर आहेच पण ते तितके आवश्यकही नसते हेही लक्षात घेतले पाहिजे. मॅक्स प्लँक या जर्मन शास्त्रज्ञाने क्वांटम हायपोथिसिस मांडताना काही ग्रंथ लिहिला नव्हता. पण गेले शतकभर जगभरातल्या शास्त्रज्ञांनी त्याला पायाभूत मानून विज्ञानातील अभ्यासक्षेत्रे कुठल्या कुठे नेऊन टाकली. देशीवादासंबंधी उलटसुलट शेरेबाजीच्या स्वरूपात आपण लोकांनी फक्त चर्चाच केलेली आहे. खरंतर अधिक कडक परखड तपासण्या करत तावूनसुलाखून घेत त्याला पुढं नेणं (वा संपवणंसुद्धा) ही आपली जबाबदारी आहे. दुर्दैवानं बाष्कळ शेरेबाजीपल्याड गंभीर प्रयत्न झालेलेच नाहीत. जे झाले वा होताहेत त्यांच्या मुळाशी अज्ञान व चुकीची गृहीतके भरपूर आहेत.

तरीही आपण चर्चा करीत आहोत त्या अर्थी तो आपल्याला महत्त्वाचा वाटतोच आहे आणि हे फक्त आपल्यासाठीच खरं नाही. जर्नल ऑफ कन्टेम्पररी थॉट, 'इलिनॉय' या त्रैमासिकाच्या विंटर २०००च्या अंकात पृष्ठ २९-४९ मधील लेखात तसेच 'वर्ल्ड लिटरेचर टुडे' या त्रैमासिकाच्या समर १९९८ च्या अंकात जॉन ऑलिव्हर पेरी या समीक्षकाने गेल्या पन्नास वर्षांत भारतातून नवं वैचारिक काय आलं आहे याचा निर्देश करताना देशीवाद आणि भालचंद्र नेमाडे एवढाच सुस्पष्ट निर्देश केलेला आहे. (दोन वर्षांपूर्वी एका लेखकांच्या प्रतिनिधी मंडळाचा सदस्य म्हणून मी पॅरिसला गेलो असताना मी एक मराठी लेखक आहे हे समजल्यावर तिथल्या अभ्यासकांनीही दोनच गोष्टींविषयी कुतूहल प्रकट केलं. एक, दलित साहित्य व दुसरी, देशीवाद. किंबहुना या दोनच गोष्टींवर मी बोललो.)

आपले मराठी समीक्षक देशीवादासंबंधी लिहिताना म्हणतात, 'देशीवाद ही काही नवी गोष्ट नाहीय. युरोपात तिकडं नेटिविझम (Nativism) या नावाखाली पुष्कळ दार्शनिक अभ्यास झालेला आहे. नेमाड्यांनी त्याचा शाब्दिक अनुवाद फारतर केलाय.' या अशा समीक्षकांनी nativismचा अभ्यास खरोखरीच केलेला आहे काय, हा माझा सवाल आहे. कारण त्या युरोपातले 'नेटिविझम' माहीत

असलेले विद्वान; त्यांना देशीवादाबद्दल कुतूहल आहे. तो एक महत्त्वाचा विचार, दृष्टिकोण आहे अशी त्यांची धारणा आहे. उलट आपले देशी समीक्षक मात्र नेटिव्ह वृत्तीनं प्रकट होत आहेत! भारतातही अहमदाबाद, बंगलोर, कानपूर, मणीपूर आणि इतर अनेक ठिकाणी सर्वच महत्त्वाच्या भाषांमध्ये देशीवादावर चर्चासत्रे आयोजित केली गेली आणि भारतीय समीक्षेत ही संकल्पना आता चांगलीच रुजलेली दिसते. अर्थात देशीवादावरची चर्चा इतर ॲकडेमिक संकल्पनांसारखी टेक्स्टबुके लिहिणाऱ्यांना अजून सोयीची नाही. त्यामुळे तिचे उपयोजन कसे करावे याची चर्चा होत असते आणि हे मराठी भाषेत विशेषकरून दिसते.

अगदी साधी गोष्ट अशी आहे की 'नेटिव्ह' ही संज्ञा जेत्या इंग्रजांनी 'आपल्या'साठी किंवा ज़िथे जिथे त्यांच्या वसाहती होत्या त्या लोकांसाठी वापरलेली आहे. म्हणजे तिचा रोख हा 'जेत्यां'कडून 'जिता'कडे आहे. उलट 'देशी' ही संज्ञा उलट्या दिशेचा संकेत करते. ज्यांच्या दिशाच मुळात एकमेकींच्या विरोधी आहेत, त्या संज्ञा एकमेकींचा अनुवाद कशा असतील? आणि हा भेद एवढ्यावर संपत नाही. 'नेटिव्ह' या संज्ञेचा पवित्राच मुळी आपल्यापेक्षा खालच्या, हिणकस अशा समूहाकडे पाहण्याचा असतो. उलट 'देशी' ही संज्ञा आत्मतेजाची जाणीव जागृत करणारी असते. असो.

आधी नेमाडे यांनी केलेली देशीयतेची मांडणी थोडक्यात समजावून घेऊ. मग त्यातल्या मोकळ्या जागा कोणत्या आहेत त्यांचा विचार करू किंवा काही ठिकाणी मला त्यासंबंधी वेगळं काही म्हणायचं आहे, तेही मांडण्याचा प्रयत्न करतो. ते बहुधा त्यांच्या मांडणीच्या विरोधात जाणारं नसेल. ते ती अधिक स्पष्ट करणारंच असेल.

नेमाडे यांनी 'टीकास्वयंवर' या त्यांच्या ग्रंथात त्याची मांडणी केलेली आहे. ती थोडक्यात अशी : 'देशी' असणे म्हणजे त्या त्या भूमीशी जोडलेले असणे. तिच्याशी नाते राखून असणे. हे नाते तिथली भाषा, संस्कृती आणि मूल्ये यांच्याशी असते. हे नाते अबाधित ठेवणारी स्वाभाविक अवस्था म्हणजे 'देशीपणा.' 'देशी' नसलेल्या, परक्या, बाहेरून येणाऱ्या मूल्ये, भाषा, संस्कृती यांचे जेव्हा देशी मूल्ये, भाषा, संस्कृती यांच्यावर आक्रमण होते तेव्हा स्वत:च्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना 'देशीवादी' व्हावे लागते. म्हणजे 'देशीवाद' ही देशीपणाची तात्कालिक प्रखर अवस्था आहे. ती आक्रमणाच्या जाणिवेच्या स्थितीत प्रकट होते. तिला स्वत:च्या अस्तित्वासाठी तसे करावे लागते. 'देशीयता'—म्हणजे 'देशी' असणे—ही देशीपणा आणि देशीवाद अशा दोहोंना सामावून घेते. हिंदुस्थानात

माणसाचे अस्तित्व टिकविण्यासाठी, त्याची ओळख पटविण्यासाठी त्याला दोन अक्षात स्वत:ला उभे करावे लागते. जातिव्यवस्था आणि देशव्यवस्था या दोन बृहद्व्यवस्था दोन अक्ष म्हणून काम करतात. संस्कृती म्हणजे परस्पर सहकार्य करणाऱ्या अनेक व्यवस्थांचे जाळे. बाहेरून पडणारे सर्व प्रभाव या व्यवस्थांमध्ये रूपांतरित करून त्यांना आत्मसात करण्याची अंगभूत शक्ती प्रत्येक जिवंत, जोमदार संस्कृतीमध्ये असते. बाहेरील प्रभाव आत्मसात करण्याच्या या प्रक्रियेला 'देशीकरण' म्हणता येईल.

'देशीपणा' हा अशा भावना, जाणिवा, विचार, प्रबोधन आणि स्मृती यांच्या पुंजाला आवाहन करतो; जो विशिष्ट भूप्रदेशाच्या साहचर्याने वाढत आलेला असतो. त्यामुळे देशीपणाच्या जाणिवेत भावनाप्रधान काव्यात्मकता अधिक असते. तर विवेकशीलता त्या मानाने कमी असते. परंपराभिमुखता जास्त आणि आधुनिकता कमी असते. तसेच तिचे तोंड भविष्यकाळापेक्षा भूतकाळाकडे जास्त वळलेले असते. देशीपणा हा मागच्या व पुढच्या सबंध समूहगणाचा प्रतिसाद असतो. सबंध समूहाच्या वंशाची ती जीवनशैली असते. समाजाची सामूहिक चिंतनशक्ती आणि भावशक्ती देशीपणानं प्रकट होते. स्थूलमानाने पाहता देशीपणाचे तत्त्व गतिशील न ठरता स्थितिशीलतेच्या जवळ जाणारे वाटते.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सनातनी, प्रतिगामी वृत्तींशी हातमिळवणी करण्याकडे देशीयतेचा कल असतो. हे जितके खरे, तितकेच हेही खरे की, सक्षम देशी व्यवस्थांची झीज घडवून आणणाऱ्या परकीय प्रवृत्तींना यशस्वी रीतीने फेकून देण्याचे देशीयता हे एकमेव अस्त्र दडपलेल्या समाजाच्या हातात असते. हिंदुस्थानच्या संदर्भात असे म्हणता येईल की, प्रदीर्घ आणि समृद्ध इतिहास असलेल्या आपल्या भूतकाळातून नेहमीच प्रभावी शक्ती प्राप्त होण्याची शक्यता असते. महात्मा गांधींची आध्यात्मिकता किंवा आंबेडकरांचे बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन अशा देशीयतेच्या प्रतिभाशाली वापराची उदाहरणे कोणत्याही तथाकथित पुरोगामी आंतरराष्ट्रीय तत्त्वांइतकीच आधुनिक भारतीय संस्कृतीला उपकारक ठरलेली आहेत.

परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील द्वंद्व चिरंतन चालू ठेवणे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असते. असा झगडा परिणामी देशीयतेशी संबंधित असतो. आधुनिक भारतीय समाजाला परंपरा आणि आधुनिकता, देशीपणा आणि आंतरराष्ट्रीयता, धर्म आणि विज्ञान, ऐहिक आणि पारलौकिक अशा अनेक द्विध्रुवात्मक क्षेत्रांमधला समताण अजून सापडलेला नाही... इंग्रजी साम्राज्यप्रणीत आंतरराष्ट्रीयता आपल्यावर स्वतंत्र झाल्या झाल्या लादली गेल्यामुळे आपल्याला

असा समताण प्रस्थापित करणे अधिक कठीण झाले आहे. ह्यामुळे आपल्या जगण्याची शैली उघडपणेच बिघडली आहे. उदाहरणार्थ, आपल्या देशी पोशाखशैलीतला पगडी, पागोटे, फेटा, पटका, मुंडासे, टोपी, रुमाल इत्यादी सर्वात महत्त्वाचा, उपयुक्त आणि सौंदर्यशील उर्ध्वभाग केवळ अडाणी, पारंपरिक आणि देशी संस्कृतीतील लोकांनीच टिकवून ठेवला.

देशीयतेचा अतिरेक एखाद्या समाजाला आत्मकेंद्रित करून ऱ्हासशील करू शकतो. जगातल्या इतर समाजांपासून विभक्त राहण्याची प्रवृत्ती त्यामुळे आपोआपच बळावते. एक प्रकारचा वंशाभिमान आणि आत्मसंतुष्ट जीवनव्यवहार अशा समाजात वाढतात. साहजिकच अशा संस्कृती परकीय आक्रमणात नष्ट होण्याची भीती असते. अल्-बिरुणीने इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या आधी अस्तित्वात असलेल्या ब्राह्मणकेंद्री हिंदू समाजात अशा देशीयतेचा अतिरेक अतिशय स्पष्टपणे वर्णिलेला आहे. तथापि हिंदुस्थानला आपला देश मानून निर्माण झालेला उदारमतवादी मुसलमानवर्ग आणि महानुभाव-वारकरी अशा ब्राह्मण्यविरोधी संप्रदायांनी देशभर उभारलेल्या आत्मशुद्धीपर देशीवादी चळवळींनी हिंदुस्थातील समाजाचा पाया पुन्हा नव्याने घालून सर्वनाश चुकविला. तथापि हा समाज पुन्हा अठराव्या शतकापर्यंत देशीपणाच्या अतिरेकाने बुरसटला आणि ज्ञानाधिष्ठित पाश्चात्त्य संस्कृतीसमोर त्याचा टिकाव लागला नाही. परसंस्कृतीच्या संपर्कात राहून नवनवे ज्ञान देशी संस्कृतीत रुजविण्याची क्रिया एकोणिसाव्या शतकानंतर पुन्हा सुरू झाली. ती अजूनही कमी-अधिक प्रमाणात चालू आहे.

चेअरमन माओ त्से तुंग यांनी १९५५च्या सुमारास म्हटले होते की, 'जवाहरलाल नेहरूंना हे कळलेले दिसत नाही की, हिंदुस्थान हा आशियाचा भाग आहे, युरोपचा नव्हे!' हे उद्‍गार गुलामगिरीतून मुक्त झालेल्या आशियाई राष्ट्रांच्या वतीने केलेली देशीयतेची सर्वसाधारण व्याख्याच म्हटली पाहिजे. आपण नेहरूकाळापासून अशीच आंतरराष्ट्रीयता उबवत आणलेली आहे की, तिच्यातून पश्चिमी राष्ट्रांना हवी असलेली पिल्ले बाहेर पडतात. तिकडच्यांच्या सोयीनुसारच आपली जाण विशाल की संकुचित आहे हे ठरते.

जगातल्या सर्वात प्राचीन मानवी संस्कृतीचे सभासद ह्या नात्याने तरी देशीयता हे मानवी अस्तित्वासाठी एक आवश्यक आणि लौकिक तत्त्व म्हणून ह्या पृथ्वीवर प्रस्थापित करायला हिंदुस्थानी लोक सर्वाधिक पात्र आहेत, असे मला वाटते.

नेमाडे यांची ही मांडणी १९८३ च्या सुमाराची आहे. जागतिकीकरणातून उद्‍भवलेलं सांस्कृतिक आक्रमण आपल्याकडं १९९० नंतर स्पष्ट झालं. त्याआधीची

ही मांडणी आहे. जागतिकीकरणाच्या संदर्भात तिचं महत्त्व आहे हे स्पष्टच होय. नेमाडे यांच्या या मांडणीत काही मोकळ्या जागा आहेत काय? याचं उत्तर होकारार्थी द्यावं लागेल आणि त्या कोणत्याही पहिल्या मांडणीत असतातच हेही स्वत:ला बजावावं लागेल. खेरीज वरवर पाहता काही परस्परविरोधी निष्कर्ष वा विधानं सापडतात का हेही पाहता येईल. ही मांडणी हिंदुत्ववाद्यांना सोयीची आहे वा हिंदुत्ववाद्यांच्या जवळ जाणारी आहे अशी टीका जी केली जाते तिचाही परामर्श या संदर्भात घेता येईल. नेमाडे यांची विधानं आणि त्यांनी दिलेली उदाहरणं यात निदान काही ठिकाणी तरी त्यांच्या उदाहरणांचं पाठबळ त्यांच्या विधानांना दिलं की त्यांच्या धारणा स्पष्ट होतात, असंही आपल्याला दिसतं. त्या मुळीच हिंदुत्ववादी नाहीत. मुळात देशीवादाची ही मांडणी आहे या स्वरूपात करताना त्यांनी मोठीच रिस्क घेतलेली आहे हेही जाणवतं. ही मांडणी अधिक नेमकी करायला जागा आहे असंही मनात येतं.*

देशीयतेचा जोरदार पुरस्कार करताना नेमाडे यांनी तिच्या मर्यादाही मांडलेल्या आहेत. देशीयतेचा अतिरेक एखाद्या समाजाला आत्मकेंद्रित करून ऱ्हासशील करू शकतो. देशीपणाच्या जाणिवेत भावनाप्रधान काव्यात्मकता अधिक असते तर विवेकशीलता त्या मानाने कमी असते. परंपराभिमुखता जास्त आणि आधुनिकता कमी असते. तिचे तोंड भविष्यकाळापेक्षा भूतकाळाकडे जास्त वळलेले असते. देशीपणाचे तत्त्व गतिशील न ठरता स्थितिशीलतेच्या जवळ जाणारे वाटते. सनातनी प्रतिगामी वृत्तींशी हातमिळवणी करण्याकडे देशीयतेचा कल असतो.

---

* नेमाडे यांनी घेतलेल्या रिस्कच्या संदर्भात आणखी स्पष्टीकरण देता येईल. मॉडर्न होणे वा तसे दाखवणे फार सोपे आणि सोयिस्कर असते. पण परंपरेत राहून नवे काही करू पाहणाऱ्यास बुरसटलेला, जुन्या विचारांचा या प्रकारचे आरोप सहन करण्याची तयारी ठेवावी लागते. रूपवाणी, मार्च २००३च्या अंकात 'पाश्चिमात्य प्रेक्षक आणि भारतीय सिनेमा' या नावाने एक लेख प्रसिद्ध झालेला आहे. सत्यजित राय यांचा हा लेख मुळात 'साईट अॅण्ड साउंड' या ब्रिटिश फिल्म इन्स्टियूटच्या त्रैमासिकात १९८२ साली प्रसिद्ध झालेला आहे. 'रूपवाणी'तला अनुवाद शाम गोस्वामी यांनी केलेला आहे. त्यातील सत्यजित राय यांची काही विधाने मासल्यादाखल नोंदवतो. '...कवी, संगीत आणि साहित्याची प्राचीन आणि संपन्न परंपरा असलेला हा उपखंड पाश्चात्यांकडून सतत दुर्लक्षित झालेला आहे...'

'...माझे सगळे चित्रपट मी माझा स्वत:चा बंगाली प्रेक्षक डोळ्यांसमोर ठेवून निर्माण केलेले आहेत. पाश्चात्य प्रेक्षकांसमोर पोहोचण्याला किमान ३ वर्षे कालावधी लागतों. 'जलसाघर' पॅरिसमध्ये पोहोचण्यासाठी २४ वर्षे लागली... लोकप्रिय बंगाली चित्रपटाचे प्रमुख तीन घटक— गाणी, मेलोड्रामा, शब्दबंबाळता— टाळून मी माझे चित्रपट निर्माण करण्यात यशस्वी ठरलो...'

'...आता असा प्रेक्षकवर्ग तयार झालेला आहे की जो केवळ ऐकण्याचेच काम करीत नाही, तर आपल्या डोळ्यांचा व बुद्धीचा वापरदेखील करतो. याच प्रेक्षकांमुळे आज गंभीर चित्रपट जगू शकतो. अर्थात त्यासाठी प्रेक्षकांना बांधून ठेवणारी कथा या सिनेमात असायला हवी...'

आता या अशा आणि इतक्या मर्यादा जर देशीयतेत असतील तर नेमाडे या वृत्तीचा पुरस्कार कशासाठी करतात, हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. या मर्यादा मांडताना नेमाडे यांनी उदाहरणे दिलेली आहेतच.

देशव्यवस्था आणि जातिव्यवस्था यांच्या द्विमित अवकाशातला 'समाज' हे थेट एकक धरल्यामुळे; तशा गृहीतकामुळे हे मर्यादेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा प्रकारचा समाजपुरुष, वा समाज हे एकक न धरता त्यातील प्रवृत्तींना एकक केल्यास या मर्यादांच्या प्रश्नांमधून रस्ता तर सापडतोच खेरीज देशीवादाच्याही दोन सुस्पष्ट प्रवृत्ती ध्वनित करता येतात. त्यांची मांडणीही करता येते. मग प्रश्न असा की अशा प्रवृत्तीच एकक का मानायच्या? यावर सरळ उत्तर असं की त्या आहेत व कायम असतात म्हणूनच त्या मानायच्या. कोणताही समाज वा मानवी समूह कोणत्याही काळात एकसंध कधीच नसतो. त्यात अनेकविध प्रवृत्ती असतात. या प्रवृत्ती स्थूलमानाने दोन प्रकारात मांडता येतात. किंवा त्याची मांडणी दोन वर्गात करता येते. एक अभिजन वर्ग आणि दुसरा बहुजन वर्ग. या वर्गांच्या प्रवृत्ती भिन्न भिन्न असतात. त्यांच्या कोणत्याही घटनांना प्रतिक्रिया देण्याची रीत निराळी असते. हिंदुस्थानी लोकांत जात हा आणखी एक घटक आहे. पण समजा की तथाकथित उच्च जाती—म्हणजे ब्राह्मण व तत्सम—अभिजनात मोडतात व उर्वरित शूद्रातिशूद्र बहुजन होत. याचा फार जास्त खल करण्याची आवश्यकता नाही. फक्त बहुजन जातीत जन्मलेले काही घटक आज अभिजन वर्गात सामावले आहेत व खेड्यापाड्यांत उरलेले काही ब्राह्मण दारिद्र्यात जीवन कंठीत आहेत या वस्तुस्थितीचा निर्देश करूया. म्हणजे अभिजन आणि बहुजन या संज्ञा आपल्याला जरा मोकळेपणाने घेता येतील.

आपल्या देशात अभिजन प्रवृत्ती ही प्राय: 'ब्राह्मणप्रवृत्ती' म्हणता येईल अशी

---

'अभिजात, मानवतावादी ही विशेषणे 'जुन्या विचारांचा' या शब्दाला सौम्य पर्याय आहेत असेच मी मानतो...'

'...बेरोजगारी, भ्रष्टाचार, स्पर्धा या वैश्विक गोष्टी आहेत. या प्रश्नांना सामोरे जाणाऱ्या कलकत्त्यातील तरुणतरुणींची वागण्याची पद्धत आणि पाश्चात्त्य जगतातील कोणत्याही मोठ्या शहरातील तरुणवर्गाची वर्तणूक जवळपास सारखीच आहे...'

'सिनेमॅटिक क्वालिटी मिळवून देणारा पोत असेल तर कोणतेही कथानक जुनाट नसते. संवेदनशीलता ही सगळ्यात महत्त्वपूर्ण बाब आहे आणि संवेदनशीलता व नैतिक भूमिका याद्वारे मानवी हेतू, मानवी आचरण—थोडक्यात मानवतावाद—याचा शोध घेता येतो...'

सत्यजित राय यांनी त्यांचे सिनेमे घडवताना घेतलेली रिस्क वरील विधानांमधून स्पष्ट होते. परंपरेत राहूनच काही आधुनिक करण्याच्या त्यांच्या धारणा या देशीवादी धारणा होत. परंपरा आणि नवता यांच्यातील अनुबंध नीट समजावून घेतले की आपल्याला सत्यजित राय, नेमाडे यांनाही नीट समजावून घेता येते.

आणि बहुजनप्रवृत्ती ही 'श्रमणप्रवृत्ती' म्हणता येईल अशी राहिली आहे. म्हणजे तसं आपल्या प्रदीर्घ सामाजिक, राजकीय इतिहासात आपल्याला दिसतं. वेदप्रामाण्य, मनुसंहिताप्रणीत चातुर्वर्ण्य मानणारी प्रवृत्ती ही प्राय: ब्राह्मणप्रवृत्ती होय आणि चार्वाक, बुद्ध, गांधी, फुले, आंबेडकर किंवा ग्यानबा-तुकारामाचे संतमंडळ ही श्रमणप्रवृत्ती होय. पहिल्या प्रवृत्तीमध्ये ईश्वरसान्निध्यासाठी धर्मगुरू, पुजारी वा तत्सम मध्यस्थाच्या आवश्यकतेचा पुरस्कार असतो. दुसरीत अशा मध्यस्थाला फाटा मारून ईश्वर आणि माणूस यात थेट संवाद शक्य मानला जातो किंवा ईश्वर आहे-नाही याची चर्चा करण्याची गरजच नाही असंही त्यातल्या काहींचं म्हणणं असतं. आपला सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक इतिहास हा प्राय: या दोन प्रवृत्तींमधल्या संघर्षाचा इतिहास आहे. यात ब्राह्मणप्रवृत्ती नेहमीच दीर्घकाळ टिकलेली, सत्तास्थानी राहिलेली व तिला अधूनमधून—अल्पकाल का होईना—श्रमणप्रवृत्तीने धक्के दिले; कधी काही काळासाठी तिला सत्ताभ्रष्ट केले असेही आपल्याला दिसते. ब्राह्मणप्रवृत्ती ही बहुश: स्थितिशीलता टिकवणारी, आधुनिकतेपेक्षा परंपरेला जवळ करणारी, परके प्रभाव नाकारणारी अशी राहिली आहे. श्रमणप्रवृत्ती ही सामान्यत: नवतेचा, आधुनिकतेचा स्वीकार करणारी, मानवी समतेचा पुरस्कार करणारी,· परके प्रभाव स्वीकारून पचवणारी अशी वाटते. यातल्या ब्राह्मणप्रवृत्तीविषयी आणखी काही नोंदले पाहिजे. तिच्यात ब्राह्मण, क्षत्रिय व तत्सम उच्च जाती येतात व त्यांच्या प्रतिक्रिया बाह्य प्रभावांच्या संदर्भात एकसंध नसतात. प्राय: सत्ताधारी असणारा हा वर्ग आपले हितसंबंध धोक्यात आले की बाह्य प्रभावांना आमंत्रितसुद्धा करतो. निदान याच्यातले काही घटक तसे करतात. आधी उदाहरणे दिलीच आहेत. पण समजा गोव्यातील सारस्वत व्यापाऱ्यांनी आपले हितसंबंध अडचणीत आले तेव्हा पोर्तुगिजांना बोलावलं हे इतिहासात नमूद आहे. किंवा दुसऱ्या बाजीरावाने यशवंतराव होळकरांच्या विरोधात इंग्रजांचे साहाय्य घेतले हेही किंवा त्याआधी नानासाहेब पेशवे याने इंग्रजांच्या नौदलाची मदत घेऊन छत्रपती शिवाजीमहाराजांनी मोठ्या दूरदृष्टीने उभारलेले आंग्रे यांचे शक्तिशाली आरमार बुडवले आणि पोर्तुगिजांचे वा इंग्रजांचे राज्य आल्यावर याच वर्गातल्या काहींनी त्या भाषांचा अंगीकार करून नव्या व्यवस्थेत जागा पटकावल्या. हे सगळं होताना याच वर्गातल्या काहींनी हे प्रभाव नाकारत संस्कृत भाषा, पठन परंपरा, वेदविद्या यांचा अंगीकार व पुरस्कार चालू ठेवला.

म्हणजे परकीय प्रभाव आल्यानंतर ज्या चार प्रतिक्रियांचा उल्लेख मी आधी केला त्यातल्या पहिल्या तीनही प्रतिक्रिया या पहिल्या म्हणजे ब्राह्मणप्रवृत्तीतून उपस्थित होतात असे म्हणता येते. उरलेला बहुजनांचा मोठा वर्ग, ज्याने कोणालाही

बोलावलेले नसते वा हितसंबंधांच्या घालमेलीत जो कुठेही नसतो त्याला मात्र त्याची इच्छा असो वा नसो; त्याला परकी प्रभावांना सामोरे जावे लागते व स्वत:ला टिकविण्यासाठी त्याला त्या प्रभावांना पचवावे लागते. अशा वर्गातून वा अशा वर्गाविषयी प्रेम, ममत्व, सहानुभूती असणाऱ्यांमधून उभे राहणारे कवी, तत्त्वचिंतक प्रभाव पचविण्याची शिकवण देतात.

नेमाडे यांनी जिला देशीयता म्हटले आहे, ती प्रकट करणाऱ्या अशा दोन ठळक प्रवृत्ती आपल्याला दिसतात. त्यांना 'अभिजन देशीयता' आणि 'बहुजन देशीयता' अशी दोन वेगळी नावे दिली असता बरेच काही स्पष्ट होते.

देशीयतेच्या ज्या मर्यादा नेमाडे यांनी मांडलेल्या आहेत त्या अभिजन देशीयतेला लागू होतात. बाहेरचे प्रभाव नाकारत आपले पारंपरिक बळ वापरून टिकण्याची यांची प्रवृत्ती असते. या प्रभावी झाल्या की समाज आत्मकेंद्रित व ऱ्हासशील होणार हे उघड आहे. या प्रवृत्तीत विवेकशीलता कमी असणे; शब्दप्रामाण्य असणे; तिचे तोंड भविष्यकाळापेक्षा भूतकाळाकडे असणे स्वाभाविकच होय. म्हणूनच अभिजन देशीयतेचे तत्त्व स्थितिशीलतेच्या जवळ जाणारे ठरते आणि प्रतिगामी वृत्तींशी हातमिळवणी करण्याकडे याच देशीयतेचा कल असतो. आज जागतिकीकरणाच्या लाटेत अमेरिका प्रभृती एकाधिकारशाही प्रवृत्तींच्या कच्छपी लागणाऱ्या आपल्या देशातील सत्ताधारी प्रवृत्ती स्वदेशीचा पुरस्कार करताना दिसतातच. त्यांचा स्वदेश, स्वधर्म, मूल्यव्यवस्था यांच्यासंबंधीचा आग्रहही त्यांनी स्पष्ट केलेला आहे. त्यांच्या देश, धर्म आणि मूल्ये यांच्या कल्पना ब्राह्मण प्रवृत्तीतल्याच आहेत. या देशाचा एक मंत्री—बहुधा मनुष्यबळ खात्याचा मंत्री—न्युक्लियर फिजिक्समध्ये डॉक्टोरेट केलेला आहे. तो रोज सकाळी दोन तास पूजाअर्चा करतो असे अभिमानाने सांगतो. खेरीज विद्यापीठ अनुदान मंडळाच्या माध्यमातून ज्योतिषशास्त्र हे शास्त्र असून त्याचा पाठ्यक्रमात समावेश करण्याचा पुरस्कारही त्याच्याच प्रेरणेने झाला आहे. किंवा असे एखादे व्यक्तिगत उदाहरण बाजूला ठेवले तरी समजा — रामजन्मस्थानाचे उदाहरण घेऊ. किमान चार हजार वर्षांआधी रामाचा जन्म कुठे झाला याची तपासणी चालू आहे. झुंडीने जाऊन मस्जीद पाडण्याचा पराक्रम करण्यात आला आहे. इतिहासाचीच एकूण पुनर्मांडणी करून त्यांना हवा तसा तो लिहिणे चालू आहे. मुसलमान हे परके, ते शत्रू. आता त्यांच्यातले जे आहेत त्यांनी मुकाटपणे इथे राहावे, या देशावर प्रेम करावे असे ते म्हणतात. या संबंधात कितीतरी प्रश्न उपस्थित करण्याजोगे आहेत. एकूणात या प्रवृत्ती स्वत:ला देशीच म्हणवतात. पण त्या 'अभिजन देशी' आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. त्यांच्या सत्तास्थानी असण्यातून आपण आत्मकेंद्री व ऱ्हासशील अवस्थेकडेच जाणार हेही सरळ आहे.



१२५२१२

आज भाजपप्रणीत आघाडी सत्तेत आहे म्हणून त्यांचे उदाहरण घेतले. त्याऐवजी काँग्रेसप्रणीत आघाडी असेल तर थोडासा फरक पडेल इतकेच; पण एकूण जी काही देशीयता व्यक्त होईल ती बव्हंशी अभिजन देशीयताच असेल.

जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण यांना निमंत्रण देणाऱ्या वा आपल्यासाठी ते अपरिहार्य करणाऱ्या अभिजन प्रवृत्तीमधल्या अभिजन देशीवादासंबंधी इतके पुरे. पण जे आले आहे वा येत आहे त्याला सामोरा जाणारा बहुजन वर्ग; त्याने कशालाही आमंत्रण दिलेले नाही तरीही त्याला ते स्वीकारणे भाग आहे. त्याला पळायला जागा नाही. लपण्यासाठी अभिजन 'कोष' नाही. तो फक्त सामोराच जाऊ शकतो आणि आपल्या अस्तित्वासाठी, आपले असणे टिकवण्यासाठी येणारी परकी मूल्ये, भाषा आणि संस्कृती यांना पचवणे त्याला भाग आहे. दुनियेतल्या अनेक बारक्या बारक्या देशातील भाषा, संस्कृती व मूल्यव्यवस्था या महालाटेत अस्तंगत झालेल्या आहेत. तेथील अभिजनांनी परकी मूल्यांचा अंगीकार केला. स्वत:ची मूल्यावस्था संपवली. तिथल्या बहुजन संस्कृतीत टिकण्यासाठी वा परकीय प्रभाव पचविण्यासाठी आयुधे पुरेशी नसल्यामुळे तिचीही तीच गत झाली.

प्रश्न आपल्यासारख्या प्रदीर्घ इतिहासाचा वारसा असलेल्या संस्कृतीचा आहे. भाषा म्हणून इंग्रजी, मराठी, रशियन, फ्रेंच यांचे वय जवळपास सारखेच आहे. कोणताही व्यापार हा संस्कृतिसंकराला उत्तेजनच देत असतो. इंग्रजी ही हुशार व्यापारी वृत्तीच्या लोकांची भाषा होती व आहे. दुनियेतल्या साऱ्या भाषांमधून शब्द, संकेत, चिन्हव्यवस्था घेऊन, त्यांना पचवून ती आधीच बलिष्ठ होत गेली. त्यात आता ती अमेरिकेची भाषा आहे. पण म्हणून तिच्या वरवंट्याखाली तितकाच प्राचीन इतिहास असलेल्या भाषांनी रगडून जायचे काय? अशा भाषिक समूहांनी ते स्वीकारायचे काय? तमाम दुनियेने अमेरिकेचे या ना त्या प्रकारे गिऱ्हाईक व्हावे; दुनियेतल्या माणसांनी त्यांच्या तालावर नाचून त्यांचे गुलाम व्हावे हे स्वीकारायचे का? ते नको असेल तर 'बहुजन देशीयता' हे एक प्रभावी अस्त्र आपण लोकांनी आपल्यातून सिद्ध केले पाहिजे. त्यांनी देशीवादी होणे क्रमप्राप्त आहे. देशीवादी असणे म्हणजे प्रभाव नाकारणे नव्हे. परकी मूल्ये नाकारणे नव्हे. देशी बहुजनांना ते शक्यही नाही. परकी मूल्ये आणि प्रभाव यांच्यातले विवेकाने स्वीकारणे; या स्वीकारासाठीचे आंतरिक बळ आपल्या मूल्यव्यवस्थेतून उभे करणे व परकी प्रभावातून मिळालेले अधिक बळ घेऊन अधिक सशक्तपणे उभे राहणे एवढा एकमेव पर्याय टिकण्यासाठी बहुजनांना खुला आहे.

एकदा हे स्वीकारले की या जागतिकीकरणातला तिसऱ्या जगातील लेखकाचा

रोल स्पष्ट होतो. त्याची भूमिका बहुजन देशीयतेचा पुरस्कार करीत व परकी प्रभाव पचवत काही मांडण्याची व शोधण्याचीच असू शकते. परकीय भाषा आणि संस्कृती यांची दहशत बाळगायचे कारण नाही. त्यांच्याखाली दबून जायचे नाही. त्यांना आत्मसात करीत आपल्या भाषेला, मूल्यव्यवस्थेला टिकवून ठेवणे व त्या बळावर परक्या संस्कृतीला बरोबरीच्या नात्याने खुल्या संवादाची संधी ठेवणे आवश्यक आहे. अभिजनांनी दिल टाकलेलं आहे. त्यांनी सरळ सरळ परकी प्रभावांचा अंगीकार केलेला आहे. हा अंगीकार म्हणजे आत्मसातीकरण नाही. ते सरळ शरण जाणे आहे. आपले सारे टाकूनच असा अंगीकार होत असतो. पण यापल्याड प्रचंड मोठ्या संख्येचा बहुजनांचा वर्ग अजूनही आहे. तेच आपले सामर्थ्य आहे.

एक उदाहरण सांगतो. आपल्यापेक्षा खूपच लहान भाषिक, सांस्कृतिक गटातून आलेल्या लेखकाचं उदाहरण देतो. हा केनियामधला लेखक आहे. त्याचं नाव गुगी (Ngugi) असं आहे. केनियावर आपल्यासारखीच इंग्रजांची सत्ता होती. गुगी याचं शिक्षण इंग्रजीत झालं. त्यानं इंग्रजी भाषेतच लेखन केलं. त्याच्या तीन-चार कादंबऱ्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यासाठी त्याला इंग्रजी वाचणाऱ्या दुनियेत चांगल्यापैकी मान्यतासुद्धा मिळाली. त्यानंतर त्यानं ठरवलं की आता आपण इंग्रजीत लिहायचं नाही. तो म्हणाला, माझी जी मातृभाषा आहे – 'गिकुयू' तिचं नाव – त्या भाषेत मी लिहिणार. या भाषेला लिखित गद्याची परंपरासुद्धा नव्हती. खूप मित्र त्याला म्हणाले की, 'बाबा, तू हा काय वेडेपणा सुरू केलायस. तू तुझं करियर बरबाद करायच्या मागं लागलाहेस. तू आणखी लिहीत राहिलास इंग्रजीत तर तुला आणखी मान्यता मिळेल. उद्या तुला नोबेल प्राईझसुद्धा मिळेल.' तो म्हणाला, 'नाही. मी माझ्याच भाषेत लिहिणार. मुळात मी कोणासाठी लिहितोय? अगदी इंग्रजीतही कोणत्या लोकांसाठी लिहितोय? कोणत्या लोकांचं लिहितोय? हे सारं मी माझ्या लोकांचं, माझ्या लोकांसाठीच लिहितोय. तर ते मी माझ्या लोकांच्या भाषेत का लिहू नये? ते मी केलं पाहिजे. तेच करणं योग्य आहे. शिकताना मला माझी भाषा उपलब्ध नव्हती. आता लिहिताना आहे. मी माझ्या लोकांसाठी माझ्या भाषेतच लिहिणार.' त्यानं तसं केलं. इतकं मोठं नाव व मान्यता असलेला लेखक मातृभाषेत लिहायला लागल्यावर बाकी अनेकजण लिहायला लागले. त्या भाषेचं, संस्कृतीचं पुनरुत्थान होण्याचा मार्ग खुला झाला.

गुगी याचं म्हणणं असं होतं की, 'मी इंग्रजीत शिकलो. इंग्रजीत लिहिलं पण ती काही माझी, माझ्या लोकांची भाषा नाही. वसाहतवाद्यांनी ती भाषा मला दिली.

या भाषेचा अंगीकार मला करायला लावणं ही मला माझ्या लोकांपासून तोडण्याची वसाहतवाद्यांची स्ट्रॅटेजी आहे; त्यांच्या डावपेचाचा भाग आहे. मी इंग्रजीत लिहीत राहिलो, त्या भाषेत विचार करीत राहिलो तर मी माझ्या लोकांपासून तुटलेलाच असेन. मला तुटायचं नाही. कारण मी त्यांच्यापैकीच एक आहे.' बहुजन देशीवादाचा अंगीकार केलेल्या या लेखकाचं उदाहरण आपल्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारं आहे. मुख्य म्हणजे लिखित गद्याची फारशी परंपरा नसलेल्या भाषिक गटातल्या लेखकानं ते घालून दिलेलं आहे.

आणखी एक उदाहरण सांगतो. ते देशीवादी होऊच न शकणाऱ्या व कदाचित प्रामाणिक असलेल्या लेखकाचं आहे. नाव सलमान रश्दी. मूळ भारतीय वंशांचा व इंग्रजीत लिहिणारा. आधी ब्रिटनमध्ये राहत होता. आता बहुतेक अमेरिकेत. त्यानं एका ठिकाणी म्हटलं होतं की, 'नाहीतरी अमेरिकन संस्कृती आता सगळ्या दुनियेवर प्रभाव गाजवणारच आहे. तर मग आपणही तिचा भाग का होऊन जाऊ नये? त्यातच आपलं हित आहे. तिच्यात जाऊनच आपल्याला सारे प्रगतीचे रस्ते खुले होतील.' त्याची ही भूमिका अर्थातच मला मान्य नाही. रश्दी याची अलीकडं मी एक कादंबरी वाचली. 'The Ground Beneath Her Feet' नावाची. ती मला आवडली. मग मला प्रश्न पडला. हे असं कसं होतंय? याची वाङ्मयीन भूमिकाच मला मान्य नाही आणि याची कादंबरी मला चांगली वाटतेय. या कादंबरीत त्यानं magic realism चा बऱ्यापैकी वापर केलाय. तिच्यात मुंबई आहे. एके ठिकाणी एक पात्र म्हणतं, 'मुंबई इलाख्याचे दोन भाग झाले. अन् आमची मुंबई महाराष्ट्र नावाच्या कुठल्यातरी प्रांताची राजधानी झाली. मला समजेनासंच झालं.' या पात्राचं बालपण मुंबईत गेलंय, त्याची घडण तिथं झालीय. पण ती एक अतिशय बारकी मुंबई आहे. दक्षिण मुंबईचा जो भाग प्राय: अँग्लो इंडियन, पारशी वा श्रीमंत मुसलमान, यहुदी अशा लोकांनी व्यापलेला होता; जिथं त्यांचं निवांत जग होतं. त्याचा बाकी मुंबईशी कसलाही संबंधच नव्हता. अशा मुंबईत जगलेल्या, वाढलेल्या पात्राचं हे म्हणणं खरंच म्हटलं पाहिजे.

पण आपल्याला तर माहीत आहे की यापल्याड मुंबईची बृहद् दुनिया आहे. तिचं चित्रण भाऊ पाध्ये आणि सआदत हसन मंटोनं जबरदस्त ताकदीनं केलंय. अगदी सलमान रश्दीच्या मुंबईचंही. रश्दीला बाहेरची मुंबई माहीतच नाही. त्यानं फार तर तिचं काही वाचलेलं असेल. त्याला स्वातंत्र्यलढा माहीत आहे. त्याला रामायण, महाभारत माहीत आहे. ग्रीक महाकाव्ये व नंतरच्या युरोपातले महत्त्वाचे

लेखन त्याला माहीत आहे. पण जगण्याच्या वास्तवात त्याच्या हरपलेल्या मुंबईनंतर त्याचं पाऊल पडतं ते थेट लंडन किंवा तत्सम युरोपी शहरात. त्याच्या जगण्याचा भूगोलच वेगळा आहे. त्याला आपली स्वत:ची भूमीच नाही. जिच्याशी जोडून घ्यावं अशी भूमीच नसलेला दुर्दैवी माणूस आहे तो. भूमी नाही अन् भाषाही नाही. म्हणूनच जी भाषा त्याच्या वाट्याला आली ती तो वापरतोय. मला हीच भाषा मिळालीय अन् मी ती वापरणार आहे असंच तो म्हणतोय. ज्याला स्वत:ची भूमीच नाही तो 'देशी' कुठून असणार? देशीवादी होण्याचा रस्ताच खुला नाहीय त्याला. या कादंबरीतलं दूधवाला नावाचं बहुधा पारशी जातीचं पात्र त्यातल्या गर्भित लेखकाला म्हणतं, 'अरे तुम्ही converts. धर्मांतरित. सदाचे निर्वासित. तुमची अवस्था सतत धावत असलेल्या आगगाडीत बसलेल्या माणसासारखी. तुम्ही जिथून निघालात, त्या भूमीशी तुमचं नातं नसतं अन् जिथं जाणार आहात तिच्याशीही. तुम्ही कुठं जाणार हे तुम्हाला माहीत नाही. तुम्ही जाणार की नाही, हेही नाही. म्हणून तुम्ही सतत आगगाडीत बसलेले असता...' रश्दीनं स्वत:ची मनोवस्थाच ध्वनित केलीय.

भूमीशी कोणतंही नातं नसण्याची रश्दीची भावनाच यातून प्रकट होते. अशा परिस्थितीत त्याच्या परीनं प्रामाणिकपणेच तो लिहीत असणार. त्याचा अमेरिकन संस्कृती अंगीकारण्याचा प्रयत्न हा भूमीशी नातं जोडण्याचा प्रयत्न आहे. त्याला ती मिळणार नाही; कारण त्याची मुळं या ना त्या प्रकारे भारतातच आहेत. पण तिथंही तो रुजलेला नाहीय. अशा परिस्थितीत लिहिणं ही मोठीच मुश्कील गोष्ट आहे. तो ती बहुधा प्रमाणिकपणे करीत असेल. पण एक वाङ्मयीन भूमिका म्हणून तो जे काही म्हणतोय त्याला आत्मसमर्थनापल्याड अर्थ नाहीय. तो म्हणतोय ते साधारणीकरण होण्याच्या लायकीचं नाहीय.

सलमान रश्दी म्हणतो त्याप्रमाणे आपणही अमेरिकन संस्कृती अंगीकारली, आपणही तिचा भाग झालो तर काय होईल? असं बघा : दुनियेमध्ये सहाशे कोटींवर माणसं आहेत. तरीही दोन माणसं एकमेकांसारखी नाहीत. प्रत्येक माणूस बाकीच्यांपेक्षा वेगळा असणं ही त्याची स्वाभाविक दृश्यओळख आहे. प्राणी, वनस्पती, निसर्गच एकूण प्रत्येक भौगोलिक क्षेत्रानुसार वेगवेगळा आहे. नुसता तांदूळ हा प्रकार घेतला तर कृषितज्ज्ञ डॉ. रिछारिया यांच्या मते नुसत्या भारतात त्याच्या २५००० पेक्षा जास्त जाती आहेत. अस्वलं, माकडं, कुत्री अशी प्रत्येक प्रदेशात वेगवेगळी. निसर्गाशी जुळवून घेत वेगवेगळी रूपं, वेगवेगळे चेहरे, आकार धारण करणारी. नुसते हत्ती म्हटले तरी भारतीय आणि आफ्रीकन हत्ती

किती वेगवेगळे दिसतात! विविधता ही नैसर्गिक गोष्ट आहे. आता याच्यात इकडून तिकडं जाणं, बदलणं, नव्या पर्यावरणात नव्या पद्धतीनं जगणं हेही असतंच. पोर्तुगिजांनी आणलेला अल्फान्सो आपल्याकडं रुजून जगप्रसिद्ध हापूस झाला. नवी, वेगळी चव आली. तसंच केळी, टोमॅटो, बटाटे यांचंही आहे. एकूण साऱ्याला ज्याचा त्याचा चेहरा आहे आणि सारं प्रभावांना, संकराला खुलं आहे. नवं काही घडण्यासाठी खुलं आहे.

जागतिकीकरणात माणसं, प्राणी, वनस्पती यांचं पुरतं सपाटीकरण करण्याची आकांक्षा आहे. जगभर सारं युनिफॉर्म आणि सोयिस्कर. ओळखीची वेगळी गरज नसलेलं. गोल टोमॅटो पॅकिंग करायला अडचणीचा म्हणून त्याच्यात जनुकीय बदल करून अमेरिकनांनी तो चौकोनी केलाय. उद्या त्यांना असं वाटलं की आंबा बिनकोयीचा असावा, त्यात काडी खुपसून त्याचा रस सुलभपणे पिता यावा तर तसाही ते तयार करतील. डुक्कर, बैल, गायी यांना खाद्यपदार्थ करून त्यांनी या सजीवांच्या आयुष्यांची निर्घृण थट्टा केलेली आहे. डुक्कराचं वजन वाढावं म्हणून त्याला खूप खाऊ घालायचं आणि हलूसुद्धा द्यायचं नाही. कॅलरीज वापरूच द्यायच्या नाहीत. डुक्कर लठ्ठ होते. पैसा अधिक. गायी म्हणजे दूध देणारे जिवंत नळ. दुनियेतली माणसं ही जिवंत गिऱ्हाईकं. उपयोगाच्या वस्तू. टोमॅटो, बटाटे, बैल वा डुकरांसारख्या. जागतिकीकरणात हे सपाटीकरण अभिप्रेत आहे. निसर्गात हस्तक्षेप करून माणसाने नेहमीच त्याला आपल्या सुखसोयींसाठी बदलत आणले आहे. पण आता जागतिकीकरणात माणसांसकट साऱ्या सजीव-निर्जीव वस्तूंचे सपाटीकरण होणार. तिथं बदलाला जागाच उरणार नाही. संकराची संधीच नाही. बदलायचं असेल, ते करणं त्यांना आवश्यक असेल तर ते बदलतील. बाकीच्यांनी तो विचार करायचा नाही. निसर्गाच्या व्यवस्थेतला हा आडमाप वा वारेमाप हस्तक्षेप दुनियेला सपाट करून टाकील. उभ्या-आडव्या कोणत्याही अक्षांच्या कल्पनांची गरजच राहणार नाही. दोन इलेक्ट्रॉन घेतले तर ते अगदी एकसारखे असतात. वेगळी ओळख न उरलेले असतात. तसंच माणसांचं. यातून दुनियेत फक्त काही माणसं साऱ्या इतरांवर ताबा मिळवणार. इतर जे आहेत ते सारे एकसारखे. वेगवेगळ्या माणसांनी वेगवेगळ्या प्रकारे विचार करून, विचारविनिमय करून, निके सत्त्व शोधून सत्याच्या निकट जायचे असते. त्यातूनच मानवी संस्कृतीचा विकास होतो असं आजवर आपण म्हणत आलो. अशा विकासात सहभागी होण्याची संधीच दुनियेतल्या बव्हंशी माणसांकडून काढून घेतली जाईल.

ज्या पद्धतीने दुनियेतील श्रीमंत देश पृथ्वीवरील ऊर्जास्रोतांचा वापर करीत आहेत त्यामुळे पृथ्वीचे वाळवंट होण्याच्या प्रक्रियेला असाधारण वेग आलेला

आहे. थर्मोडायनॅमिक्सचे दोन साधे नियम आहेत आणि अजून तरी ते सर्वमान्य आहेत. त्यातल्या पहिल्या नियमानुसार विश्वातील ऊर्जा ही अविनाशी आहे. ती संपत नाही. ती नित्य आहे आणि दुसऱ्या नियमानुसार ही ऊर्जा नेहमी जास्त उपलब्धीकडून कमी उपलब्धीकडे जात असते. म्हणजे ऊर्जा असते पण उत्तरोत्तर ती कमी उपलब्धीकडे जाते. तसा तिचा नैसर्गिक प्रवास असतो. समजा आपण वाहनासाठी पेट्रोल वापरतो. ते जाळून ऊर्जा मिळवतो. या प्रक्रियेत जितकी ऊर्जा गाडी चालवण्यासाठी उपलब्ध होते त्यापेक्षा कितीतरी जास्त धूर, बाहेर पडणारा गॅस याद्वारे बाहेर फेकली जाते. ही बाहेर फेकली गेलेली ऊर्जा असतेच पण ती आता सहज उपलब्ध नसते. तो कचराच असतो. त्यातून पुन्हा ऊर्जा उपलब्ध करणं मुश्कील असतं.

आपण लोक अजून फार कमी ऊर्जा वापरतो. तरीही आपले आदर्श अमेरिकनच आहेत. ते अपरिमित नासाडीचेच आहेत. दुनियेत जिथं जिथं ऊर्जेचे नैसर्गिक स्रोत आहेत तिथं तिथं अमेरिकेला त्यावर ताबा हवा. त्यासाठी त्या देशाचं वाळवंट झालं तरी त्याची त्यांना फिकीर नाही. परवा घाना नावाच्या देशातल्या परिस्थितीवर एक डॉक्युमेंटरी मी बीबीसीवर पाहिली. एका भागातल्या जमिनीत सोनं होतं. सरकारने त्या जमिनी शेतकऱ्यांकडून नाममात्र पैसे देऊन घेतल्या आणि धनदांडग्या विदेशी कंपन्यांना सोनं काढण्यासाठी दिल्या. त्यांनी त्या जमिनीतलं सोनं काढलं. त्यासाठी केलेल्या खोदकामातून आतल्या दगडमातीचे प्रचंड डोंगर तिथे उभे राहिले. मग पुन्हा त्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यात आल्या. तर तिथं सारे भलेमोठाले डोंगर. जमिनीला फूल यायला, तिला लागवडीयोग्य होण्याला किती काळ जावा लागतो याची शेतकरी मंडळींना कल्पना असते. त्या डॉक्युमेंटरीत तिथला शेतकरी बीबीसीच्या प्रतिनिधीला दाखवत होता, इथं इथं माझी जमीन होती. मी अशी अशी पिकं काढत होतो. अन् आता हे सारे डोंगरच डोंगर. यांच्यात आता मी काय करू?

याप्रकारे वापरणे, मूल्यवान गोष्टी काढून घेणे व बाकी टाकून देणे हा भांडवलवादी जागतिकीकरणाचा चेहरा आहे. त्यासाठीच इराकला धमकावले जातेय. त्यासाठीच व्हेनेझुएलासारख्या देशात अमेरिकाधार्जिणा सत्ताबदल होतो.

या प्रकारच्या ऊर्जेच्या साधनांची अपरिमित लूट, दुनियेचं सांस्कृतिक सपाटीकरण याला मान्यता कशी द्यायची? याच्यात सहभागी व्हायचं म्हणजे कसं व्हायचं? यात सहभागी होणं म्हणजे अंततः घानामधल्या त्या शेतकऱ्यांसारखे डोंगर दाखवायला सज्ज होणं. हताश होणं. संपून जाणं.

जागतिकीकरणाचा हा अमानवी चेहरा ओळखणं; त्याला सामोरं जात त्यातल्या अमानवी पवित्र्यांचा प्रतिकार करणं साहजिकच आवश्यक आहे. तो करायचा तर या प्रक्रियेला आपल्या अटींवर आपल्यात घेतलं पाहिजे. त्यासाठी अटी घालण्याइतकी ताकद प्रकट केली पाहिजे. ती अर्थातच आपल्या मूल्यव्यवस्थेतूनच प्रकट होणार आणि ही मूल्यव्यवस्था म्हणजे काही बंदिस्त, अविचल, स्थितिशील चौकट नव्हे. तीही प्रभावांना खुलीच असली पाहिजे. आपल्या बहुजनांना तर दुसरा इलाजच नाही. येणारे पचवणे व त्यासकट उभे राहणे एवढाच रस्ता त्यांना खुला आणि त्या प्रक्रियेत टिकण्यासाठी बहुजन देशीयता. बहुजन देशीवाद.

'तिसऱ्या जगातल्या' लेखकाला; ज्याचे त्याची भाषा, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था यांच्याशी नैसर्गिक असे गंभीर नाते आहे, त्यालाही याखेरीज वेगळा पवित्रा उपलब्ध नाही.

❑❑❑

124292
31-3-08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

## रंगनाथ पठारे

जन्म २० जुलै १९५०, एम. एस्सी. एम. फील. संगमनेर महाविद्यालय संगमनेर येथे जून १९७३ पासून भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत. सध्या विभागप्रमुख. 'रथ', 'चक्रव्यूह', 'ताम्रपट', 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'दु:खाचे श्वापद', 'नामुष्कीचे स्वगत' इत्यादी कादंबऱ्या; 'सत्त्वाची भाषा', 'आस्थेचे प्रश्न' हे समीक्षात्मक लेखन तसेच चार-पाच कथासंग्रह प्रकाशित. महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार, प्रियदर्शनी पुरस्कार, दमाणी पुरस्कार, विखे पाटील पुरस्कार, महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित. 'लोकपंचायत', 'कॉ. दत्ता देशमुख प्रबोधिनी' या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सहभाग.

## श्रमिक प्रतिष्ठान

समाजजीवनात आर्थिक बाजूला प्रमुख स्थान असते. तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनालाही महत्त्व असते. सर्व शोषित समाजाचे नेतृत्व करण्याची ऐतिहासिक जबाबदारी संघटित कामगारांनी पार पाडावी अशी रास्त अपेक्षा असते व आहे. ही अपेक्षा अजूनही पूर्ण होत नाही. या एकांगी अर्थवादी प्रवृत्तीवर मात करण्याचे एक छोटेसे साधन म्हणून 'श्रमिक प्रतिष्ठान'ची स्थापना करण्यात आली. समाजाचे अर्थकारण, समाजकारण, कला, क्रीडा, प्रबोधन या संबंधीच्या योग्य जाणिवा वृद्धिंगत करणे आणि विविध कृतींना प्रोत्साहन देणे हे 'श्रमिक प्रतिष्ठान'चे उद्दिष्ट आहे. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बँक एम्प्लॉईज युनियन, सदर्न महाराष्ट्र बँक एम्प्लॉईज युनियन आणि आयटक कामगार केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त प्रयत्नातून हे प्रतिष्ठान कार्य करीत आले आहे. लोकशाहीर कॉ. अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त जिल्ह्यातील शाहिरांच्या स्पर्धा; कविवर्य नारायण सुर्वे यांना कबीर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार; कवी संमेलन; सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयांवर नामवंत अभ्यासकांची व्याख्याने; नाट्य अभिनय शिबिर, विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर इत्यादी उपक्रम प्रतिष्ठानने राबविले आहेत.

Library IIAS, Shimla
MR 891.46 P 273 J
00124292

मूल्य : १० रुपये

ISBN 81-88284-23-8